# पंढरी संचार

• पंढरपूर • सोमवार, ३० डिसेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - २२०




गुंडगिरीने भरकटलेले राजकारण ! PII



पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर PIII

## At a Glance

### तरुणाने विवाहित महिलेचा केला विनयभंग



**बार्शी :** घराच्या दरवाजावर जोराची लाथ मारून घरात घुसून तरुणाने विवाहित महिलेच्या मनाला लज्जा वाटेल, असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यावेळी तिने घराबाहेर कोण आहे, म्हणून बघण्यासाठी घराचा दरवाजा उघडत असताना, गावातील खंडू बोडरे यांनी दरवाजावर जोराची लाथ मारून घरात घुसला केला व फिर्याद विवाहितेच्या हाताला धरून तिच्या अंगाशी झोंबाझोंबी करीत तिच्या म्हणाला लज्जा वाटेल, असे कृत्य केले. त्यावेळी विवाहिता मोठमोठ्याने ओरडल्याने तिची दोन्ही मुले जागी होऊन रडू लागली, त्यावेळी खंडूने घरातून धूम ठोकली.

### प्रॉपर्टीच्या कारणावरून एकास मारहाण



**अक्कलकोट :** संगोगी (ता. अक्कलकोट) येथे प्रॉपर्टीसाठी आला का, असे म्हणून एका काठीने, दगडाने मारहाण करण्यात आली. याबाबत अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी श्रीशैल हार्डीकर, मनोहर हार्डीकर, श्यामबाई हार्डीकर, शशीकला हार्डीकर, कल्पना हरळेकर, सविता डिग्गेकर, विश्वनाथ हरळेकर (सर्व रा. संगोगी ब ता. अक्कलकोट) यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत सूर्यकांत शरणप्पा शाखापुरे (रा. संगोगी ब, ता. अक्कलकोट) यांनी फिर्याद दिली आहे.

### पत्नीच्या खूनप्रकरणी पतीला ५ दिवसांची पोलिस कोठडी



**बार्शी :** भिसीमुळे कर्जबाजरी झाल्याचा राग मनात धरून पुण्याला जाण्याचा बहाणा करून पतीने पत्नीला दुचाकीवरून शेतात नेऊन तिचा खून केला. याप्रकरणी पती अनंत रामचंद्र साळुंखे यास पोलिसांनी अटक करून बार्शी न्यायालयात उभे केले असता त्यास पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. मनीषा अनंत साळुंखे यांच्या खुनाची घटना दि. २७ रोजी नागोबाची वाडी (ता. बार्शी) येथे उघडकीस आली. याबाबत तपास अधिकारी पोलिस निरीक्षक दिलीप ढेरे यांनी बार्शी न्यायालयासमोर उभा केले असता पुढील तपासात सात दिवस पोलिस कोठडी सुनावली.

### वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यावर कारवाईची ग्रामस्थांची मागणी



**श्रीपूर :** सोलापुरात वैद्यकीय पदवी नसताना वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या कारवाई करण्याची मागणी श्रीपुर ग्रामस्थांनी केली आहे. सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना श्रीपुर येथील ग्रामस्थ नरसिंह साळुंखे यांनी निवेदन देत मागणी केली आहे. श्रीपुर येथील कोणतीही पदवी नसताना नाडी परीक्षण करून नागरिकांना औषध देणारे पांडुरंग देवडकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## जिल्हा दूध संघ संचालकांना नोटीसा

# 9 जानेवारीपर्यंत उत्तरासाठी मुदत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्यात दूध संकलनात अग्रेसर असलेला सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघ संचालक मंडळाच्या मनमानी कारभारामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. यामुळे संकटात सापडलेल्या दूध संघाला वर काढण्यासाठी शासनाने लक्ष घातले आहे. मनमानी कारभार करणाऱ्या संचालक मंडळाला नोटीसा बजावण्यात आल्या असून याचे उत्तर ९ जानेवारीपर्यंत देण्याची मुदत देण्यात आली आहे. यामुळे जिल्हा दूध संघ संचालक मंडळ बरखास्त होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे . सोलापूर जिल्ह्यात उजनी व नीरा डावा उजवा कालव्याचे पाणी मिळत असल्याने जिल्हा सुजलाम सुफलाम झाला आहे. शेती व्यवसायास जोड व्यवसाय म्हणून





शेतकऱ्यांनी दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे. यामुळे दुधाला चांगला दर देण्यासाठी व शेतकऱ्यांचे दूध खरेदी करण्यासाठी सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाची स्थापना 1981 साली करण्यात आली आहे. दूध संघाची स्थापना झाल्यानंतर हा संघ चांगल्या प्रकारे चालला. दररोज लाखो लिटर दुधाचे संकलन होत होते. दुधापासून विविध पदार्थ तयार करण्यात येत होते. राज्यभर जिल्हा दूध संघाचे वितरण करण्यात येत होते. जिल्हा दूध संघ चांगल्या प्रकारे चालल्यामुळे या संघाने मुंबई, पुणे, सोलापूर, पंढरपूर, बार्शी अशा अनेक गावात दूध संकलन केंद्रे निर्माण केली होती. मात्र गेल्या दहा वर्षापासून जिल्हा दूध संघातील संचालक मंडळाच्या मनमानी कारभारामुळे जिल्हा दूध संघ आर्थिक अडचणीत सापडला आहे. गरज नसताना जिल्हा दूध संचालक मंडळाने १ कोटी ४४ लाख रुपयाची मशनरी खरेदी केली आहे. त्यापैकी 72 लाख 50 हजार रुपयांच्या मशनरी अद्याप संघाकडे आल्या नाहीत तसेच संघाकडे 165 कर्मचारी असताना नव्याने कर्मचाऱ्यांची गरज नसताना 22 कर्मचारी भरती केली आहे. तसेच अनेक प्रकारे मनमानी कारभार केल्याने जिल्हा दूध संघ आर्थिक अडचणीत येऊन संघावर कोट्यावधी रुपयाचे कर्ज झाले आहे. यामुळे शासनाने जिल्हा दूध संघाकडे लक्ष केंद्रित केले असून मनमानी कारभार करणाऱ्या संचालक मंडळांना नोटीसा बजावल्या आहेत. त्यांना 9 जानेवारीपर्यंत उत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हा दूध संघ संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नेमणूक करण्याची हालचाल सुरू झाली आहे. यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

## नवीन वर्षापासून बनावट शिधापत्रिका रद्द होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** देशातील गोरगरीब नागरिकांना एक वेळचे पोटभर जेवण मिळावे म्हणून केंद्र सरकारने स्वस्त धान्य दुकानातून शिधापत्रिका धारकांना मोफत धान्य देण्यास सुरुवात केली आहे. मात्र काही नागरिकांनी बनावट शिधापत्रिका तयार करून याचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे. बनावट शिधापत्रिका तयार करून लाभ घेणाऱ्यावर कारवाई करण्यात येणार असून नवीन वर्ष १ जानेवारीपासून बनावट शिधापत्रिका रद्द करण्यात येणार आहेत. कारवाई होणार असल्याने अनेक नागरिकांचे धाबे दणाणले आहेत . कोरोना कालावधीमध्ये सर्व व्यवहार ठप्प असल्याने गोरगरीब नागरिकांचे नुकसान झाले आहे. अनेक जण आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा गोरगरीब नागरिकांना एक वेळचे पोटभर जेवण मिळावे म्हणून राज्य शासनाने गरिबांना शिधापत्रिका दिल्या आहेत. त्यांना स्वस्त धान्य दुकानातून कमी दरात धान्य दिले जात आहे. मात्र केंद्र सरकारने कोरोना पासून गोरगरीब नागरिकांना मोफत धान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. स्वस्त धान्य दुकानातून मोफत धान्य मिळत असल्याने अनेकांनी बनावट शिधापत्रिका तयार करून याचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे. ही बाब पुरवठा विभागाच्या लक्षात आली आहे. यामुळे पुरवठा विभागाने बनावट शिधापत्रिका शोध मोहीम सुरू केली आहे. नागरिकांना आधार कार्ड हाताचा ठसा घेऊन पॉस मशीनद्वारे नोंदणी व केवायसी केल्यानंतर धान्य दिले जात आहे. याद्वारे बनावट शिधापत्रिकांचा शोध घेतला जात आहे. बनावट शिधापत्रिका तयार करणाऱ्या वर कारवाई करण्यात येणार असून त्यांच्या शिधापत्रिका 1 जानेवारी 2025 पासून बंद करण्यात येणार आहेत. बनावट शिधापत्रिका तयार करणाऱ्या वर कारवाई होणार असल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत.



## 'उजनी'तील विसर्गामुळे पक्ष्यांची संख्या वाढणार !



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** जिल्ह्यांसह मराठवाड्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातून (यशवंत सागर जलाशय) सध्या सोलापूर शहरवासीयांची तहान भागवण्यासाठी पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले आहे. परिणामी, तुडुंब भरलेल्या धरणाचे काही काठ उघडे पडून स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांना मुबलक खाद्यान्न उपलब्ध होणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत पक्ष्यांची गर्दी वाढेल, असा अंदाज पक्षिअभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी व्यक्त केला आहे.

## सोलापूर जिल्ह्यात नो पोषण आहारातून अंडी गायब

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** जिल्ह्यातील चार लाख 68 हजार विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून पोषण आहाराचे अनुदान रखडल्याने पोषण आहारातून अंडी गायब झाल्याचे चित्र जिल्ह्यातील अनेक शाळेत दिसत आहे. अशा शाळांवर कारवाई करण्याची गरज असल्याचे पालकांतून बोलले जात आहे.



थंडीच्या दिवसांत विद्यार्थ्यांच्या पोषणासाठी शाळांमध्ये अंडी देणे गरजेचे आहे. पण नेमक्या त्याच काळात आहारातून अंडी गायब झाली आहेत. अंडी न खाणाऱ्या विद्यार्थ्यांना पर्याय म्हणून केळी, फळे पुरवण्याचा शासन निर्णय आहे. परंतु हा निर्णय कागदावरच राहत असल्याचे चित्र सध्या जिल्ह्यातील अनेक शाळेत दिसत आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना आठवड्यातून एकदा अंडी देण्याचा निर्णय झाला. मात्र, याकडे शाळेकडून दुर्लक्ष होत असल्याने जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी हिवाळ्यात अंड्यांपासून वंचित राहात आहेत. ऐन हिवाळ्यामध्येत पोषण आहारातून अंडी गायब झाली आहेत. याकडे शासन व प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून पालक वर्गातून होत आहे.

## राज्यात रोजगार हमी योजनेची 5 लाख 99 हजार कामे मंजूर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**पंढरपूर :** ग्रामीण भागातील मुजरांच्या हाताला काम मिळावे म्हणून केंद्र व राज्य शासनाने रोजगार हमी योजना सुरू केली. या अंतर्गत मुजरांना 262 प्रकारची विविध कामे देण्यात येतात. सन २०२४- २५ सालासाठी राज्यात 5 लाख 99 हजार रोजगार हमी योजनेची कामांना मंजुरी देण्यात आली. मात्र डिसेंबर 2024 पर्यंत 80 हजार कामे पूर्ण झाली आहेत. कमी प्रमाणात कामे झाली असल्याने मजुरांनी कामाकडे पाठ फिरविली असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात उद्योग व्यवसाय नसल्याने मजुरांच्या हाताला काम मिळत नाही. यामुळे केंद्र व राज्य शासनाने ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला काम मिळावे म्हणून रोजगार हमी योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत 262 प्रकारची विविध कामे मजुरांकडून करून घेऊन त्यांना वेतन दिले जात आहे. केंद्र सरकारकडून 100 दिवसाचे वेतन व नंतरचे वेतन राज्य शासन देत आहे. रोजगार



» पान ३ वर

## भूमिपुत्रांवर पाणी वाटपात अन्याय नको..!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** उजनी धरणातून २६ डिसेंबर पासून सोलापूर शहर तसेच भीमा नदी काठच्या शहरे व गावांच्या पाणी पुरवठा योजनांना पाणी मिळावे यासाठी उजनी धरण सांडव्यावरून पाणी सोडण्यात आले आहे. सुरवातीस २ हजार क्युसेक पाणी सोडले जात असून गरजेनुसार ६ हजार क्युसेक पाणी टप्पाटप्प्याने सोडण्यात येणार आहे. उजनी धरणात आज १०३. १२ टक्के (११८. ९० टीएमसी) पाणी असून धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. मात्र धरणात उपलब्ध असलेल्या पाण्याचे जून २५ पर्यंतचे काटेकोर नियोजन करावे अशी मागणी भीमा नदीकाठच्या दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांनी एका निवेदनाव्दारे केली आहे.


## वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

'दै.पंढरी संचार'

आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.

- संपर्क -

रविकिरण पाटील - ८२०९९४२३४६

दत्तात्रय बनसोडे - ९९०९७६४७५

बुकिंग मर्यादा १५ जानेवारीपर्यंत.


## मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत

## 1684 शेततळ्यासाठी 11 कोटी 10 लाख रुपयाचे अनुदान वाटप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात मागील त्याला शेततळे ही योजना राबविण्यात आली होती. याचा लाभ हजारो शेतकऱ्यांनी घेतला. मात्र 1784 शेतकऱ्यांचे शेततळ्याचे अनुदान गेल्या अनेक वर्षांपासून रखडले होते. हे अनुदान 11 कोटी 10 लाख रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांतून आनंद व्यक्त होत आहे. सोलापूर जिल्हा दुष्काळी म्हणून ओळखला जातो. प्रत्येक वर्षी म्हणावा तसा पाऊस पडत नाही. यामुळे शेतीला पाणी मिळण्यास अडचण निर्माण होते. म्हणून पावसाचे वाया जाणारे पाणी शेततळ्यात साठवून ते शेतीसाठी देण्यासाठी मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना शासनाने जाहीर केली. या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मागील त्याला शेततळे देण्याची योजना सुरू केली. यासाठी हजारो शेतकऱ्यांनी अर्ज दाखल करून आपल्या शेतात शेततळी निर्माण केली. यामुळे पावसाचे पाणी शेततळ्यात साठल्याने याचा लाभ पिकांना झाला. मात्र जिल्ह्यातील 1684 शेतकऱ्यांचे शेततळ्याचे अनुदान गेल्या अनेक वर्षापासून रखडले होते. यासाठी कृषी विभागाने शासनाकडे पाठपुरावा केला होता.राज्यात महायुतीचे सत्ता पुन्हा आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी जिल्ह्यातील रखडलेल्या शेतकऱ्यांचे अनुदान देण्यास सूचना केली. त्यानुसार १७८४ शेतकऱ्यांचे 11 कोटी 10 लाख रुपयाचे अनुदान मंजूर करून ते त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. मागेल त्याला शेततळे या



» पान ३ वर

पंढरी संचार

**सोलापूर** : लापुरातील हैदराबाद रस्त्यावरील मुळेगाव शिवारातील सोन्या मारुती पेट्रोल पंपाच्याजवळील ब्रिजच्या नाल्यात पडून अज्ञात इसमाचा मृत्यू झाला. हा प्रकार 27 डिसेंबर रोजी रात्री 8. 40 वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला. अज्ञात इसमाला बेशुद्ध अवस्थेत हवालदार एफ. एम. बागवान यांनी बाहेर काढून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला होता.

## सांगोला विद्यामंदिर स्नेहसंमेलन

# विविध गुणदर्शन सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज वार्षिक स्नेहसंमेलन २०२४- २५ रविवार दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी दुपार सत्रामध्ये प्रशाला विविध गुणदर्शन सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. सकाळी प्रशाला व ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.त्यानंतर संगीत फिशपॉडस,फिशपॉडस अर्थात शेलापागोटे या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांना मनमुराद आनंद घेतला. शेला पागोट्याने हसता- हसता काहींचा आत्मगौरव झाला तर काहींना आत्मभानही आले. सकाळी १०.०० वा. संस्थापक अध्यक्ष कै.गुरूवर्य चं.वि.तथा बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार समर्पित करण्यात आला व वाहतूक निरीक्षक सांगोला आगार सागर कदम फनफेअर,संस्था कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके विज्ञान प्रदर्शन, सौ.राही विश्वेश झपके कला प्रदर्शन,जि.प.प्रा. शाळा.नं.३ मुख्याध्यापिका जुबेन शेख यांचे हस्ते रांगोळी प्रदर्शन उद्‌घाटन झाले.यावेळी संस्थासचिव मल्लिकार्जुन घोंगडे,संस्था खजिनदार शंकरराव सावंत,संस्था सदस्य ॲड विजयसिंह चव्हाण व प्रशासकीय अधिकारी यांची उपस्थिती होती. दुपार सत्र प्रशाला विविध गुणदर्शन उद्‌घाटन परीक्षक प्रशांत मिसाळ यांचे हस्ते नटराज पूजन व श्रीफळ वाढवून झाले.यावेळी परीक्षक निरंजन केंगार यांचे हस्ते बापूसाहेब झपके व परीक्षक कु.मृणाल राऊत यांचे हस्ते कै.बाईसाहेब झपके यांच्या प्रतिमेस पुष्पहार समर्पित करण्यात आला. त्यानतर संपन्न झालेल्या विविध गुणदर्शनामध्ये वैयक्तिक नृत्य, लावणी, रिमिक्स व सामूहिक नृत्यामध्ये गोंधळ गीत, साऊथ इंडियन रिमिक्स,तामिळ, देशभक्तीपर गीत,नाटीका, महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारी गीते,कृष्णा थीम तसेच विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला या २०० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभाग असलेल्या गीतातून कै.गुरूवर्य बापूसाहेब झपके,कै.बाईसाहेब झपके, प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्या कार्याचा गौरव झाला.सर्व गीत प्रकार सदरीकरणानी आस्वादकांची मने जिंकली. या बहारदार कार्यक्रमाच्या आस्वादनासाठी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला संस्था कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके ,सौ.राही झपके, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे ,मच्छिंद्र इंगोले,प्रशाला स्नेहसंमेलन प्रमुख बापूसो सावंत,ज्यूनिअर कॉलेज स्नेहसंमेलन प्रमुख प्रा.तानसिंग माळी, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रशाला नागेश भोसले, ज्युनिअर कॉलेज प्रमुख प्रा.सुप्रिया गायकवाड, यांचेसह सर्व विभाग प्रमुख व विभागतील शिक्षक, तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले.

## वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसवा




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार राज्य शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसविण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील वाहनधारकांनी हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसवावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी एजंसी निश्चित करण्यात आली असून, एचएसआरपी नंबर प्लेटसाठी बुकींग करण्यासाठी http: // maharashtrahsrp. com हे पोर्टल निश्चित करण्यात आले आहे. वाहनधारकांनी पोर्टलवर बुकींग करून, अपॉइंटमेंट घेऊन ही नंबर प्लेट बसवून घ्यावी.

## » Selected

### आ. देशमुख यांची पाथरीकरांशी विकासकामांबाबत चर्चा


**सोलापूर :** भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील पाथरी गावाला सदिच्छा भेट दिली. निवडणुकीत मिळालेल्या ऐतिहासिक विजयानंतर त्यांनी गावकऱ्यांची भेट घेऊन आभार मानले. यावेळी आमदार देशमुख यांनी विधानसभा निवडणुकीत मला विजयी करून सलग तिसऱ्यांदा जनसेवेची संधी दिल्याबद्दल ग्रामस्थांच्या आभार मानले. यावेळी ग्रामस्थांसोबत आपुलकीने संवाद साधून आगामी काळात गावात करावयाच्या उपायोजना आणि विकासकामांबाबत चर्चा केली.

### तिर्हे गावच्या विकासासाठी प्रयत्न करू



**सोलापूर :** विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख यांनी आपल्या विधानसभा मतदारसंघाचा जनसंवाद दौरा सुरु केला आहे. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधण्यासाठी आणि आभार मानण्यासाठी तिर्हे येथे भेट दिली. या प्रसंगी त्यांनी ग्रामस्थांसोबत संवाद साधला आणि मतदानरुपी दिलेल्या साथीबद्दल आभार मानले. त्याचबरोबर तिर्हे गावचा विकास साधण्यासाठी तसेच महिला सक्षमिकरणासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न केले जातील अशी ग्वाही दिली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

### मनपाकडून दीड लाखांचा दंड वसूल



**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेकडून प्लास्टिक बंदी विरोधात जोरदार कारवाई सुरू असून महापालिकेच्या विशेष पथकाने 183 दुकानांची तपासणी करून 28 दुकानांवर कारवाई करत 1 लाख 40 हजारांचा दंड वसूल केला आहे. महापालिका आयुक्त शीतल तेली उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली प्लास्टिक विरोधी कारवाई मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहिम नवी पेठ, बाळीवेस, मुळेगाव रोड, अक्कलकोट रोड, सत्तर फूट रोड, नीलम नगर, कुमठा नाका, आदी परिसरात राबवण्यात आली.

## युवराज गायकवाड यांनी जपली सामाजिक बांधिलकी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : चळे तालुका पंढरपूर येथे चार, आठ दिवसाला ग्रामपंचाय सार्वजनिक पाणीपुरवठ्याचा प्रश्न निर्माण होतो. आणि नदि काठावर असणारे चळे गावात पाणी प्रश्न भेडसावतो.मागील अनेक दिवसापासून चळे गावचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटलेला नाहि. चळे ग्रामपंचायतीचे पाणी फक्त सांडपाणी म्हणून वापरण्यात येथे. अने दिवसापासुन हे गांव पिण्याच्या पाण्या पासुन वंचित आहे. गावातील नागरिकांना सार्वजनिक पाणीपुरवठा करत असताना ग्रामपंचायतीलाहि अनेक अडचणी येत होत्या. नदि पासुन पाचशे फुटाच्या अंतरावर असणार्या या गावाला अनेक वर्षापासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. त्यातच चळे ते बरड वस्ती या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे काम सुरू झाल्यामुळे गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन वेळोवेळी लिकेज झाल्यामुळे गावाला सार्वजनिक पाणीपुरवठा करता येत नव्हता.
मागील सहा दिवसापासून दर्लिंग मंदिराकडील असणाऱ्या पाणीपुरवठा विहिरीवरून येणारा पाणीपुरवठा हा बंद होता. पाणी बंद असल्यामुळे प्रभाग क्रमांक 2 व 3 येथील नागरिकांना पाण्यासाठीअनेक संकटाशी सामना करावा लागत होता.त्यामुळे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य युवराज गायकवाड हे नागरी कांच्या मदतीला धावले.कारण मागील वीस वर्षाचा काळामध्ये महिला डोक्यावर पाण्याचा हंडा घेऊन पाणी भरत होत्या तसाच प्रकार आत चळे गावात 21 वे शतक उलटले तरी सुरु होता. हा प्रकार विद्यमान सदस्य युवराज गायकवाड यांच्या लक्षात येताच त्यांनी आपल्या शेतीसाठी



असणाऱ्या विहिरी वरील पाईप लाईन मधून चळे ग्रामपंचायतीला पाणी पुरवणा करणाऱ्या टाकीमध्ये मध्ये सोडले.आपल्या स्वतःच्या विहिरीतील पाणी हे पाणीपुरवठा योजनेसाठी दिल्याने सध्या तरी गावातील सार्वजनिक पाण्याचा प्रश्न सुटला आहे. परंतु चळे गावाचा कायम स्वरूपी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी ग्रामस्थ व महिलां मधून होत आहे.

## देणगी

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** विघ्नेश्वर विष्णू जोशी या भाविकांने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास एक लक्ष रुपयाची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. देणगीदाराचा श्रीचे उपरणे व प्रतिमा देऊन मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीच्या सदस्या श्रीमती शकुंतलाताई नडगिरे यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते.



# गुंडगिरीने भरकटलेले राजकारण !



शुद्ध विचार, शुद्ध आचार आणि निःस्सीम राष्ट्रभक्ती हा राजकारणाचा मजबूत पाया असतो. संपूर्ण देशातलं विशेषतः महाराष्ट्रातलं राजकारण सध्या जे समोर येताना दिसतंय ते अविचार आणि स्वार्थांधता तसेच गुंडगिरीचे बलस्थान असलेले राजकारण गेल्या १५-२० वर्षापासून देशाबरोबरच या महाराष्ट्राच्या भूमीतही स्थिर होत असल्याचे दिसून येत आहे. बिहारमध्ये काय घडलं, काय घडत आहे, मणिपूरमध्ये काय घडलं, काय घडत आहे, हे अविचारी राजकारण गेल्या कांही वर्षापासून महाराष्ट्रात स्थिर होताना दिसत आहे. भाजपची मातृ संस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना डॉ. केशव बळीराम हेगडेवार यांनी केली. ते मुळचे अखिल भारतीय काँग्रेस पक्षात कार्यरत होते. बॅ. जीना यांच्या सामाजिक व्दंदवाची निर्मिती होत असतानाच हिंदु संघटन मजबूत करावे या पवित्र उद्देशाने डॉ.हेगडेवार यांनी संघाची स्थापना केली. वेदप्रणित हिंदु संस्कृतीचा वारसा जतन झाला पाहिजे आणि यातून हिंदुत्व ही प्रेरणा बनली पाहिजे या शिवाय संघाची स्थापना करण्याचा कोणताही उद्देश डॉ. हेगडेवारांचा नसावा असा विश्वास वाटतो.

जनसंघाच्या निर्मितीनंतर राजकारणात परिवर्तन होत गेले आणि यातूनच भाजपाची राजकीय उर्मी जागृत झाली. आणि संघाची एक वैचारिक टीम राजकारणात उतरली. भाजपाच्या धोरणाला काँग्रेसनी तसेच कम्युनिस्ट पक्षांनी आणि देशातील अन्य पक्षांनी विरोध करायला सुरुवात केली. हा विरोध इतका वाढत गेला आणि यातूनच स्वार्थांध राजकारणाची निर्मिती झाली. कामराज, देवेगौडा यांनी वेगळी चलू मांडली. काँग्रेस पक्ष फुटला आणि काँग्रेसच्या विचाराचे व्ही.व्ही.गिरी राष्ट्रपती झाले. पुढे काँग्रेसमध्येही शकलं पडली गेली. आणि सोनिया गांधी यांच्या विदेशीकरणामुळे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही वेगळी चूल मांडली. आणि फुटीर राजकारणाचे बीजारोपण झाले. कै. यशवसंतराव चव्हाण, डॉ.धनंजयराव गाडगीळ, वि.स.पागे यांच्यापासून ते अगदी खा. तायाप्पा हरि सोनवणे, वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील ते अगदी भाई छन्नूसिंग चंदेलेपर्यंत जाती-पातीचा विचार न करता काँग्रेसेची मुळे खोलवर रुजवली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र शासनाने शासन सुमारे ११ वर्षे कै. वसंतराव नाईक यांनी सांभाळले.पुढे खंजीर खुपसण्याचे प्रकार घडले आणि वसंतदादांना पायउतार व्हावे लागले. आणि इथूनच राजकारणाची घडी बदलली. ती पूर्णपणे विस्कटली गेली. विचार संपले. आचार संपले. राष्ट्रनिष्ठा कमकूवत झाली आणि राजकारणाला गुंडगिरीचे प्रोत्साहन मिळत मिळत आमचे राजकारण येथे पोहोचले. समाजवादी पक्षाचे नानासाहेब गोरे, एस.एम. जोशी, श्रीपाद अमृत डांगे यांनी काँग्रेसच्या विरोधात राजकारण




केलं. पण काँग्रेसच्या विरोधात गुंडगिरीचा स्पर्श सुद्धा त्यांना होऊ शकला नाही. पुढे सत्ताधाऱ्यात कलह वाढत गेला. आणि गुंडांना राजकीय स्थैर्य मिळू लागले हे वास्तव्य आम्ही कसे नाकारु शकणार.

हा इतिहास सांगण्याचे मुख्य कारण महाराष्ट्रातल्या मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात गाव कारभार करणाऱ्या एक तरुण सरपंचाचा झालेला निर्घृण खून. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावातील एक तरुण उमदा सरपंच असलेले संतोष देशमुख यांचा राजकारणाच्या डावघावात, राजकारणात पोसलेल्या गुंडाकडून हत्या करण्यात आली. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल होऊन १८ दिवस होऊन गेले तरी अजून या तरुण सरपंचाचा मारेकरी पोलिसांच्या जाळ्यात अडकला नाही. या प्रकरणात दोन-तीन, चार आरोपींना जेरबंद करण्यात यश मिळाले असले तरी या हत्येचा मास्टरमाईंड असलेला अजूनही फरार आहे. याचा अर्थ काय घ्यायचा ? शनिवारी या गावात सर्वपक्षीय प्रचंड मोर्चा निघाला. या मोर्चात विविध पक्षातल्या आमदारांनी एका मंत्र्याचे नांव घेऊन या आरोपीला पाठबळ दिल्याचे जाहीर सुतोवाच करण्यात आले. यातील मास्टरमाईंट असलेला वाल्मिक कराड अजूनही फरार आहे. सीआयडीचा तपास प्रामाणिकपणे सुरु असून सुद्धा हा पोलिसांचा हाती लागू शकत नाही. या पाठीमागचे गुपित काय? वाल्मिक कराड याने केलेल्या कृत्याने पूज्य भगवान बाबा गडकर यांच्या पवित्र भूमीला केवढा मोठा डाग लागला याची आपण कल्पनाच करु शकत नाही.

बीड जिल्ह्यात मस्साजोग येथे गुंडाकडून घडलेला हा प्रकार महाराष्ट्राच्या अनेक ठिकाणी होताना दिसतो.

कांही ठिकाणी तो उजेडात येतो तर कांही ठिकाणी नेर्तृत्वाच्या ओझ्याने दाबनू टाकला जातो. हे वास्तव आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत स्पष्टपणे हा दोषी माणूस कोणत्याही पक्षाचा असो, कुणाच्याही जवळचा असो, केवढाही मोठा असो त्याचे फोटो कुणाबरोबरही काढलेले असो त्याला जेरबंद केल्याशिवाय सरकार थांबणार नाही असे निक्षून सांगितले. त्याप्रमाणे दोन दिवसापूर्वीस खास आदेश काढून सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी या मस्तवाल गुडांच्या आरोपींच्या स्थावर मालमत्ता जप्त करण्याची मोहिम हाती घेतली आहे. महाराष्ट्रातल्या अनेक भागात या अक्षम्य गुन्ह्याबद्दल मोर्चे, आंदोलने, उपोषण सुरु आहेत. वास्तविक पाहता आज राजकारणाची दिशा बददलेली आहे. अशा गुंडगिरीला विरोध करताना सुद्धा जे विरोधक समोर उभा राहतात त्यांनीही अत्यंत वेडेवाकडे आरोप करायचे आणि राजकारणाची रया घालवनू टाकायची. यात विरोधक गुंतलेले दिसतात. हेही नाकारता येणार नाही. अनेक आमदार, खासदार या कृत्याच्या विरोधात मैदानात उतरले असले तरी या कुटुंबातल्या कुटुंबियांना न्याय मिळावा म्हणून आपले उट्टे काढण्यासाठी व्देष, मत्सराच्या फैरी झाडायच्या हे किपत योग्य आहे? या प्रकरणात दोषी असलेल्या दुष्ट आरोपीला शासन मिळालेच पाहिजे हे निविर्वाद सत्य कोणीही नाकारु शकणार नाही. पण हे निमित्य करुन कुणावर तरी आगपाखड करुन आपला व्देष, मत्सर व्यक्त करण्याची भूमिका व्यक्त करणे याचाही विचार होणे गरजेचे आहे.

याच प्रकरणाचा धागा पकडून एका आमदार महाशयानी अत्यंत सोज्वळ व प्रामाणिक भूमिका सादर करणारी महिला कलाकार असलेली प्राजक्ता माळी या निरापराध महिलेवर सुद्धा शब्दांची गरळ ओकायला कमी केली नाही. याबाबत आपले मनोगत व्यक्त करताना घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्राजक्ता माळी हिने प्रत्येक शब्दाला आपल्या नेत्रातील अश्रूची साथ देत देत जे वास्तव पत्रकार परिषदेत मांडले हे हृदयद्रावक आहेच आहे पण एका निष्पाप कलाकार महिलेवर घेतलेले तोंडसुख हे राजकीय मस्तीचे द्योतक म्हणावे लागेल. या समाजाचे मनोरंजन करणाऱ्या महिलेचा या प्रकरणाशी काय संबंध आहे. एखाद्या नियोजित कार्यक्रमाला ती माऊली गेली हा तिचा दोष आहे? याचे भान राखायला हवे होते. म्हणून राजकारणाची दिशा आज पूर्णपणे बदललेली दिसते. सत्ता, सत्तेतून संपत्ती आणि संपत्तीतून पुन्हा सत्ता हेच राजकारणाचे उदिष्ट्य असेल तर राजकारणाची परवड झाल्याशिवाय राहणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सत्तेच्या खुर्चीपेक्षा कर्तव्याला अधिक महत्व देणारे व्यक्तीमत्व आहे. रेशीम बागेल्या आचार-विचराची तालीम घेतलेला व्यक्ती आहे. सत्तेपेक्षा कर्तव्य आणि समाजहित अधोरेखित करणारे फडणवीस या अन्यायाला न्याय दिल्याशिवाय राहणार नाहीत हे सत्यही नाकारता येणार नाही.

गेल्या कांही वर्षापासून राजकारणात गुंडगिरी पोसल्या शिवाय राजकारण करता येत नाही. हा राजकारण्यांचा समाज झाला आहे. पण त्यामुळे समाजमन किती भरकट आहे. प्रत्येक गावात, प्रत्येक शहरात, प्रत्येक राज्यात हेच वास्तव समोर येताना दिसते आहे. याला पोसणारे राजकारणी खड्यासारखे वेचून बाजूला काढणे ही जबाबदारी आता जनतेची आहे.



प्रासंगिक

**बाळासाहेब बडवे**
(संपादक)
मो.नं.7028543453

**सोलापूर :** महान अर्थतज्ञ, भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे निधन झाले होते. एआयसीसी मुख्यालयातून त्यांची अंतिम यात्रा निघाली. निगम बोध येथे शासकीय आणि लष्करी इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी त्यांच्या अंतिम यात्रेत सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे, प्रवक्त्या सुप्रिया श्रीनाते यांनी सहभागी होत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## जीहे कटापूर योजनेचे पाणी

# पावसाळी हंगामात माळशिरस तालुक्यातील गावांना देणार - जयकुमार गोरे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री जयकुमार गोरे यांची त्यांच्या आंधळी येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले यावेळी त्यांनी हे आश्वासन दिले गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये माळशिरस तालुक्यातील रेडे गावामध्ये त्यांनी जेहे काठावर योजनेतील पावसाळी हंगामामध्ये अतिरिक्त पाणी संभुखेड येथे सोडून ते पाणी रेडे येथील बंधारे व तलाव भरण्यासाठी दिलेल्या आश्वासन त्यांनी पूर्ण केले.

त्यामुळे ते आमदार असताना हे आश्वासन पूर्ण केल्याने लोकांच्या अपेक्षा वाढल्याने आता ते नामदार आहेत त्यामुळे त्यांनी माळशिरस तालुक्यातील जळभावी मानकी भांब फडतरी या गावांना पाणी देण्यासाठी माण तालुक्यातील मोही खुटबाव इंजभाव संभुखेड पर्यंती या गावांमधून पाणी सोडल्यास माळशिरस तालुक्यातील कन्हेर लोणंद इस्लामपूर गावांना याचा फायदा होईल यासाठी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदन दिले.

यावेळी त्यांनी या योजनेतून या गावांना पाणी देणार असे आश्वासन दिले यावेळी सोलापूर जिल्हा सह प्रभारी के के पाटील किसान मोर्चा जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब सरगर युवा मोर्चा तालुकाध्यक्ष युवराज वाघमोडे मिनीनाथ मगर ॲड गणेश सिद आदी मान्यवर उपस्थित होते

## वृक्षतोड केलेले सहा ट्रक लाकूड केले जप्त



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सांगोल्या मध्ये वनविभागाच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली आहे. विनापरवाना सहा ट्रक वृक्षतोड केलेले लाकूड हे वनविभागाकडून जप्त करण्यात आले आहे. सांगोला तालुक्यातील लाकूड हे कोकणामध्ये निघाले होते. फेस लाकूड जप्त करण्यात आले आहे. लाकडासह झालेल्या वन विभागाच्या कारवाई मधून सहा ट्रक लाकडाचा माल जप्त करण्यात आला. वनविभागाच्या धडक कारवाईमुळे सध्या सांगोला तालुक्यात मोठी खळबळ माजली आहे. तुकाराम जाधवर वनपरिक्षेत्राधिकारी यांनी दिली आहे.

» पान १ वरुन

## राज्यात रोजगार हमी योजनेची ....

हमी योजनेस कामास कमी वेतन मिळत असल्यामुळे अनेक मजुरांनी या कामाकडे पाठ फिरविली आहे. तर बाजारात एका दिवसासाठी 700 ते 1000 रुपये मिळत आहेत. यामुळे मजुरांचा ओढा खाजगी कामाकडे वाढला आहे. यामुळे रोजगार हमी योजनेच्या कामाकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. राज्यातील मजुरांना हाताला काम मिळावे म्हणून शासनाने सन 2024-25 सालासाठी 5 लाख 99 हजार कामांना मंजुरी दिली आहे. मात्र डिसेंबर 2024 पर्यंत 79 हजार कामे पूर्ण झाली आहेत. यामुळे रोजगार हमी योजनेकडे मजूर पाठ फिरवत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात 1972 साली दुष्काळ पडल्यानंतर रोजगार हमी योजनेची कामे सुरू करण्यात आली होती. या कामावर लाखो मजूर काम करत होते. मात्र दुष्काळ संपल्यानंतर मजुरांनी रोजगार हमी योजनेच्या कामाकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येत आहे.

## 1684 शेततळ्यासाठी 11 कोटी....

योजनेसाठी सोलापूर जिल्ह्यात 25000 शेतकऱ्यांनी अर्ज दाखल केले होते. लॉटरी पद्धतीने सोडत काढून 1860 शेतकऱ्यांना याचा लाभ देण्यात आला होता. शासनाने मागील त्याला शेततळ्याची योजना जाहीर केल्यामुळे याचा लाभ सोलापूर जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना मिळाला. यामुळे शेतकऱ्यातून समाधान व्यक्त होत आहे.

# इस्रोच्या शास्त्रज्ञांच्याकडून प्रदर्शनाचे उद्घाटन

**बार्शी :** एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रीसर्च बार्शी येथे तालुका विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन बेंगलोरु येथील इसरो शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत वैष्णवी प्रभाकर पाटील यांच्या हस्ते झाले. पाटील यांनी तंत्रज्ञान व संशोधन यामधील फरक स्पष्ट करून विद्यार्थ्यांना संशोधनात करिअर करण्याचे व बार्शी तालुक्यातून जास्तीत जास्त संशोधक तयार होतील यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे असे मार्गदर्शन केले. प्रास्ताविक बार्शी तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी माननीय बालाजी नाटके यांनी केले.



Selected

## ८. ५७ लाखांचा ऐवज लंपास

**सोलापूर :** वैद्यकीय शिक्षणासाठी कर्नाटकात स्वतःच्या भावाला प्रवेश देण्याकरिता गेलेले कुटुंब परत येईपर्यंत त्यांचे घर चोरट्यांनी फोडून १७ तोळे सोन्याचे दागिने आणि रोकड असा आठ लाख ५७ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला. अकलूजमध्ये स्वरूप नगरात ही घरफोडी झाली. याबाबत गौरव गजेंद्र पोळ यांनी अकलूज पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार कापडाचे व्यापारी असलेले गौरव पोळ यांचे बंधू सुरज याचा कर्नाटकातील बसवकल्याण येथे एका आयुर्वेदिक महाविद्यालयात वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित झाला होता.



## हरंगुळ- पुणे रेल्वे गाडीस मुदतवाढ - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** हरंगुळ -पुणे (गाडी क्र. 01487) व पुणे -हरंगुळ (गाडी. क्र. 01488) या गाडया लातूरसह धाराशिव व बार्शी येथील प्रवाश्यांची पुण्याला जाणारी महत्वाची गाडी असून सदर रेल्वे गाडीस मुदत 30 डिसेंबर 2024 रोजी संपत होती. लातूर-धाराशिव-बार्शी येथून मोठया प्रमाणात नागरीक पुण्याकडे ये-जा करत आहेत. ही गाडी रेल्वे प्रवाश्यांच्या सोईने असल्या कारणाने पुणे - लातूर ये- जा करणे सोईचे झाले होते. परंतू रेल्वे निर्णयानुसार मुदत संपत आल्याने खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सदर गाडीस मुदतवाढ देणेबाबत महाप्रबंधक मध्य रेल्वे मुंबई यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार सदर रेल्वेगाडीस मुदतवाढ दिली असल्याचे रेल्वे मुख्यालय मुंबई यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

## मेळावा...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** दै.पंढरी संचार ' च्यावतीने विक्रेते आणि अधिकृत एजंट यांचा नूतन वर्षाच्या निमित्ताने शुभेच्छा देण्यासाठी घेतलेल्या मेळाव्यात सर्व विक्रेते, प्रमुख एजंट, विक्रेते संघाचे अध्यक्ष महेश पटवर्धन आणि संपादक बाळासाहेब बडवे.

## जिल्हा दूध संघाला अखेरची घरघर



**सोलापूर :** गेली काही वर्षे आर्थिकदृष्ट्या डबघाईला आलेल्या सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघाचे संचालक मंडळ बरखास्त करण्याच्या हालचाली शासन पातळीवर सुरू झाल्या आहेत. दूध संघावर कर्तव्य कठोर प्रशासकाची नेमणूक व्हावी किंवा त्याचा ताबा राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाकडे (एनडीडीबी) सोपविण्यात यावा, अशी मागणी केली जात आहे.

नियमित वाचा
पंढरी संचार

# पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्याची प्रथा सगळी कडे मोठ्या प्रमाणावर पहायला मिळत आहे. शहरी भागात अलीशान सोसायट्या मोठमोठी हॉटेल्स, तसेच खासगी फार्म हाऊस अशा विविध ठिकाणी मित्र मंडळींसोबत थर्टी फस्ट मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. या निमित्ताने हॉटेल्स आणि अनेक विवीध संस्था वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करतात, त्यासाठी वेगवेगदळ्या ऑफर्सही दिल्या जातात त्याची जाहिरातबाजीही केली जाते. हा प्रकार आता ग्रामीण भागातही पहायला मिळत आहे. पार्टीच्या उत्साहात नियमांचे उल्लंघन होउ नये यासाठी पोलीस प्रशासन पण सज्ज झाले आहे. पार्टी करणाऱ्यांनी सावधानता बाळगली नाही तर पोलीस ॲक्शन मोडवर आहेत . अशी माहिती माळशिरस पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी दिली आहे.

सरत्या वर्षाला निरोप देताना अती उत्साही तरूणांकडून नियमांचा भंग होऊ नये यासाठी पोलीसांनी विविध भागांत वेगवेगळे पथके तयार करुन ते तैनात केले आहेत. त्यामुळे आपल्याकडून कोणतेही चुकीचे कृत्य घडू नये व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे होऊ नये याची काळजी मध्यप्रेमींनाच घ्यावी लागणार आहे. तसे न झाल्यास कारवाई होऊ शकते .त्यामुळे आधीच काळजी घेण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## एसटी बसमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बारामती ते इंदापूर मार्गे बार्शीकडे निघालेल्या बस प्रवासामध्ये अनोळखी युवकाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्याची घटना घडली. गोष्ट लक्षात येताच पीडितेच्या पालकांनी थेट गाठले बार्शी शहर पोलीस ठाणे, आरोपीने अल्पवयीन मुलीला आपल्या मोबाईल मध्ये अश्लील व्हिडिओ दाखवत केला विनयभंग, रमेश सुब्राव बनसोडे नामक आरोपीला बार्शी शहर पोलिसांच्या ताब्यात आरोपीवर पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

## आनंद चंदनशिवे यांनी घेतले खंडोबाचे दर्शन



**माळशिरस :** सोलापूर शहर हद्दवाढ भागामधील बाळे येथे श्री क्षेत्र खंडोबा यात्रा सुरू असून येथील यात्रेनिमित्ताने आज दिनांक 29 डिसेंबर रविवारी सकाळी सात वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी दर्शन घेतले. यावेळी यात्रेनिमित्त भाविकांची मोठी गर्दी पडली आहे.







## पंढरपूर जवळ बस व मालवाहू ट्रक अपघात

# दोन भाविक जागीच ठार तर पंधरा भाविक जखमी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर जवळ असलेल्या भटूबरे गावानजीक पुणे जिल्ह्यातील भाविकांच्या खासगी बसचा व मालवाहू ट्रक चा समोरासमोर अपघात आज रविवार दि २९ डिसेंबर रोजी सकाळी ६: ३० वा झाला. या भिषण अपघातात दोन भाविकांचा मृत्यू झालाय. यामध्ये काही प्रवासी गंभीर जखमी झाले.

यामध्ये १५ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान अपघात इतका भीषण होता की बसचा चुराडा झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहचले. यानंतर अपघातामधील जखमींना पंढरपूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. पंढरपूर ते टेंभुर्णी या मार्गावरील भटुंबरे गावच्या हद्दीत पंढरपूर पासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर खाजगी प्रवासी वाहतूक करणारी भाविकांची बस आणि



माल वाहतूक ट्रकचा भीषण अपघात होऊन दरम्यान या अपघातामध्ये दोन भाविकांचा जागीच मृत्यू झाला असून अन्य आठ भाविक जखमी झालेले आहेत. जखमी भाविकांना सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेले आहे. अपघातग्रस्त बस ही पुणे जिल्ह्यातील असून मयत भाविक मावळ तालुक्यातील आहेत अशी प्राथमिक माहिती पोलिस प्रशासनाकडून देण्यात आली. पंढरपूर - टेंभुर्णी या मार्गावरील पंढरपूर शहरापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर भटुंबरे गावच्या हद्दीत रविवारी सकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास हभप तुकाराम खेडलेकर महाराज मठाच्या समोर हा अपघात झाला. टेंभुर्णी कडून पंढरपूरकडे येत असलेल्या भाविकांची बस (क्र.एम.एच. १४ एल.एस.३९५५) चा पंढरपूरकडून टेंभुर्णीकडे निघालेल्या मालवाहतूक ट्रक ( क्रमांक आर जे १४ जी एल १७८०) सोबत समोरासमोर धडक झाली. या अपघातात बस आणि मालवाहतूक ट्रकचा समोरचा भाग चक्काचूर झालेला आहे. बस मधील २ प्रवाशांच्या जागीच मृत्यू झाला असून अन्य जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघात झाला तेव्हा प्रचंड मोठा आवाज झाल्याने गावकरी धावत आले, यावेळी अनेक जखमी ओरडत होते, ग्रामस्थांनी त्यांना बसमधून बाहेर काढले.

# जीएसटीचा सावळागोंधळ

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली वस्तू व सेवा कर समितीची दर दोन महिन्यांनी होणारी बैठक नेहमीप्रमाणे पार पडली. नेहमीप्रमाणेच या बैठकीनंतर कर धोरणाबाबत अनेक गोंधळ समोर आले. एकतर या बैठकीत ज्या प्रकारचे निर्णय घेणे अपेक्षित होते ते निर्णय घेण्यात आले नाहीत आणि जे निर्णय घेण्यात आले ते कर सुलभीकरणाच्या मूलभूत तत्त्वालाच छेद देणारे म्हणता येतील. विशेषतः पॉपकॉर्नवर करनिर्धारण करत असताना ज्या प्रकारचा गोंधळ समोर आला आहे त्याबाबत सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात थट्टा सुरू आहे. 'एक देश एक कर एक बाजारपेठ' या मूलभूत तत्त्वाप्रमाणे देशात वस्तू व सेवा कर सुरू होऊन आता आठ वर्षे होऊन गेली आहेत; पण अद्यापही या अप्रत्यक्ष कर धोरणाबाबतचा गोंधळ कायम आहे. प्राप्तिकराचे निर्णय जरी वर्षातून एकदा अर्थसंकल्पामध्ये घेतले जात असले, तरी वस्तू व सेवा कराबाबतचे निर्णय दर दोन महिन्यांनी होणाऱ्या वस्तू व कर समितीच्या बैठकीमध्ये घेतले जातात. केंद्रीय अर्थमंत्र्यांसह देशातील सर्व राज्यांचे अर्थमंत्री या बैठकीला जरी उपस्थित राहात असले, तरी वस्तू व सेवा कर सुलभ करण्याकडे अद्यापही या समितीने लक्ष दिलेले नाही. मुळात जेव्हा वस्तू व सेवा कर कायदा अस्तित्वात आला तेव्हाच त्या कायद्याबाबत अनेक गोंधळ होते. हा कायदा संसदेत संमत झाल्यानंतरच्या दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये सरकारला याबाबत शेकडो खुलासे करावे लागले होते आणि अजूनही याबाबत खुलासे चालूच आहेत. 'एक देश एक कर प्रणाली' यामुळे अर्थव्यवस्थेला शिस्त लागेल आणि सर्व व्यवहार सोपे, सुलभ आणि सुरळीत होतील असे वाटत असताना वस्तू व सेवा कर कायद्यातील काही तरतुदींमुळे गोंधळ वाढण्याची स्थिती अनेक वेळा निर्माण होताना दिसत आहे. सर्वसामान्य करदात्यांसह कर नियोजनाचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही सोपी वाटेल अशा प्रकारची करप्रणाली असावी असे तत्त्व सर्वसाधारणपणे सर्व अर्थव्यवस्थांमध्ये पाळले जाते; पण भारतीय वस्तू व सेवा कर कायद्यामध्ये मात्र कर सुलभीकरणाच्या तत्त्वालाच फाटा दिला आहे, असे दिसते. ज्या प्रकारे पॉपकॉर्नवर विविध तीन प्रकारचा कर लावण्याचा निर्णय या मीटिंगमध्ये घेण्यात आला ते पाहता सर्वसामान्यांच्या आणि व्यापाऱ्यांच्या मनातील गोंधळही वाढणार आहे. याबाबत सरकारने पुन्हा नवीन खुलासा केला आहे. एकीकडे अशा प्रकारचे निर्णय होत असताना दुसरीकडे विमा या महत्त्वाच्या विषयावर जो कर आकारला जातो तो कमी करणे किंवा पूर्ण रद्द करणे याबाबतचा निर्णय मात्र अद्यापही समितीला घेता आलेला नाही. विम्यातील गुंतवणूक एकीकडे करदात्याला आयकरामध्ये सवलत देत असताना त्याच विम्यात गुंतवणूक करत असताना मात्र करदात्याला वस्तू सेवा कर मात्र भरावा लागतो. हा विरोधाभास संपवण्याचे काम वस्तू व सेवा कर समिती कधी करणार आहे हे समजत नाही. समितीच्या पुढील बैठकीमध्ये याबाबत निर्णय होण्याचे संकेत जरी देण्यात आले असले तरी जो काही निर्णय होईल त्यामुळे कर सुलभीकरणाची प्रक्रिया सुरळीत होईल आणि गोंधळ वाढणार नाही याची काळजी समितीला घ्यावीच लागेल. सध्या भारतीय वस्तू व सेवा कर प्रणालीमध्ये ०%, ५%, १२%, १८% आणि २८% असे टप्पे आहेत. या टप्प्यांची संख्या कमी करावी याबाबतचा विचारही काही कालावधीपासून सुरू आहे. पण याबाबत अद्याप सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे तो गोंधळ कायम आहे. सरकार इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीला प्रोत्साहन देत असताना दुसरीकडे सरकारने जुन्या वाहनांच्या विक्रीवर असणारा वस्तू व सेवा कर वाढवला आहे ज्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचाही समावेश आहे. म्हणजेच सरकारच्या मूळ धोरणाला छेद देण्याचे अनेक निर्णय जर वस्तू व सेवा कर समितीच्या बैठकीत होत असतील, तर कुठेतरी काहीतरी चुकत आहे हे लक्षात घ्यावे लागेल. सरकार जरी ठराविक कालावधीनंतर वस्तू व सेवा कराच्या संकलनामध्ये होत असलेली वाढ याबाबत निर्णय जाहीर करत असले आणि ही वाढ अभिनंदनीय असली तरी अद्याप ही कर प्रणाली सर्वसामान्य व्यापारी आणि अनेक संबंधितांसाठी साधी सोपी ठरलेली नाही. गेल्या काही वर्षांत अर्थसंकल्पामध्ये सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न करून प्रत्यक्ष कराची प्रणाली साधी व सोपी केली आहे पण तशाच प्रकारचा निर्णय अप्रत्यक्ष कराबाबत म्हणजेच वस्तू व सेवा कराबाबत घेण्यात सरकार अद्याप पुढाकार घेत नाही. वस्तू व सेवा कराशी व्यापाऱ्यांचा दररोज संबंध येतो आणि रिटर्न भरण्याच्या निमित्ताने मासिक किंवा त्रैमासिक या प्रणालीचा विचार करावा लागतो. म्हणजे देशातील कोट्यवधी व्यापारी आणि व्यावसायिक यांच्यासाठी वस्तू व सेवा कर हा दैनंदिन जिव्हाळ्याचा विषय झाला आहे. आयकर प्रणालीची प्रक्रिया वार्षिक असते पण वस्तू व सेवा कराची प्रणाली दैनंदिन व्यवहाराचा भाग बनत असल्याने ती अधिक साधी सोपी व सुरळीत होण्याची गरज आहे. येत्या महिनाभराच्या कालावधीमध्येच म्हणजे एक फेब्रुवारी रोजी सरकार आपला नवीन अर्थसंकल्प सादर करेल. त्यानंतर वस्तू व सेवा कर समितीची पुढील बैठक होणार आहे. साहजिकच या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने वस्तू व सेवा कराची प्रणाली अधिक सोपी करण्याच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्पामध्ये काही निर्णय घेण्याचा विचार अर्थमंत्री सीतारामन यांनी करायला हवा. कोणत्याही विषयाबाबत एखादा निर्णय झाल्यावर सर्वसाधारणपणे गोंधळ संपणे अपेक्षित असते. पण वस्तू व सेवा कराबाबत एखादा निर्णय झाल्यानंतर हा गोंधळ जास्तच वाढतो असे आजपर्यंत दिसून आले आहे. म्हणूनच या करप्रणालीवर अजूनही टीका होत आहे. साहजिकच सरकारने आता या विषयाची गंभीर दखल घ्यावी.

> बांगला देशामध्ये अल्पसंख्यांक हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे, अत्याचारांमुळे सध्या भारतात अनेक राज्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. हिंदू विरोधात झालेल्या हिंसाचारामध्ये बंगलादेशातील जमाते इस्लामी या कट्टरपंथी संघटनेचा सर्वात मोठा वाटा आहे. यापूर्वीच्या काळातही याच संघटनेने हिंदूंचे अक्षरशः शिरकाण केले होते. १९७१ च्या युद्धात झालेला ३५-४० लाख हिंदूंचा वंशविच्छेद अमेरिकन पत्रकार गॅरी बासला जगासमोर आणावा लागला. बांगलादेशात भारतीयांची संपत्ती बांगलादेश सरकारने ताब्यात घेतली आहे. दुसरीकडे बांगला देशी घुसखोरांमुळे भारतामध्ये अंतर्गत सुरक्षेसह अनेक आव्हाने उभी राहात आहेत. या घुसखोरांना एनआरसीसारख्या प्रक्रिया राबवून शोधण्याची व त्यांची हकालपट्टी करण्याची गरज आहे

# आव्हान बांगला देश आणि बांगला देशीचे

अवघ्या पाच दशकांपूर्वी 'एक धर्म एक राष्ट्र'अशा वैचारिक मांडणीस पूर्णपणे नाकारून बंगाली अस्मितेवर आधारलेल्या राष्ट्रवादाचा पुरस्कार केलेल्या बांगलादेशमध्ये इस्लामी मूलतत्त्ववादाच्या प्रभावामुळे आमार शोनार बांगलाची वाटचाल आता वहाबी मूलतत्त्ववादाकडे सुरू आहे. हिंदूसह ख्रिश्चन, बौद्ध यांच्यासारखे अल्पसंख्याक जीव मुठीत घालूनच राहत आहेत. त्यांना येथील कडव्या मूलतत्त्ववाद्यांच्या अत्याचारांचा सामना करावा लागत आहे. बांगलादेशातील हिंदू आपल्या सुरक्षेविषयी अत्यंत घाबरले आहेत. याचबरोबर काहींना भारतीय सीमेवर पलायन केले आहे. काही कट्टरपंथीयांनी त्यांची क्रूर हत्या केली, तर बांगलादेशच्या हिंदू महिलांवरही आत्याचार होताहेत. बांगलादेशात हिंदूंवर होणारे हल्ले सध्या भीषण आणि चिंताजनक रुपात पोहोचले असले तरी ते आत्ताच होत नसून अनेक वर्षांपासून होत आहेत. तीन वर्षांपूर्वी दूर्गा पूजेच्या काळात अज्ञात समाजकंटकांनी तीन डझनभरपेक्षा अधिक पूजा मंडपात हल्ले घडवून आणले. गेल्या दहा वर्षात दूर्गा पूजा, होळी, दिवाळी, महाशिवरात्र, जन्माष्टमी असो किंवा सरस्वती पूजा असो, प्रत्येक सणात विघ्न आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. हिंदूंचा एकही सण असा जात नाही की त्यावेळी बांगलादेशमध्ये कोणत्या ना कोणत्या भागात अप्रिय घटना घडलेली नसेल. या हल्ल्यांमुळे बांगलादेशातील एक कोटी हिंदू नागरिक दहशतीखाली वावरत आहेत. या दहशतीमुळे बांगलादेशातून चोरट्या मार्गाने पलायन होण्याचे प्रमाणही वाढत आहे.

हिंदू विरोधात झालेल्या हिंसाचारामध्ये बंगलादेशातील जमाते इस्लामी या कट्टरपंथी संघटनेचा सर्वात मोठा वाटा आहे. यापूर्वीच्या काळातही याच संघटनेने हिंदूंचे अक्षरशः शिरकाण केले. अनेक युवक या हिंसाचारात सामील झाले ज्यांचे मुख्य काम होते हिंदूंच्या घरातून सामान पळवायचे, त्यांच्या बायकांवरती अत्याचार करायचा आणि सध्या उद्भवलेल्या हिंसाचारामध्ये आपला स्वतःचा फायदा करून घ्यायचा. 'जमात-ए-इस्लामी' ही एक धार्मिक व राजकीय संघटना आहे, ज्याचा प्रभाव दक्षिण आशियात विशेषतः पाकिस्तान, भारत, आणि बांगलादेशात दिसून येतो. या संघटनेचा इतिहास वादग्रस्त असून, अनेक विवाद आणि हिंसाचाराच्या घटनांमध्ये या संघटनेचा सहभाग आहे. विशेषतः बांगलादेशातील अशांतता आणि तेथील राजकीय घटनांमध्ये या संघटनेची महत्त्वाची भूमिका असल्याचे दिसते. 'जमात-ए-इस्लामी'ची स्थापना १९४१ साली मौलाना अबुल आला मौदूदी यांनी लाहोर येथे केली होती. संघटनेचे मुख्य ध्येय इस्लामिक राज्याची स्थापना करणे होते. त्यांनी इस्लामी कायद्याच्या आधारे समाज व शासन चालवण्याचे विचार मांडले. या संघटनेची सुरुवात धार्मिक विचारप्रणाली आणि राजकीय दृष्टिकोनाच्या आधारावर झाली. जमात-ए-इस्लामीचा इतिहास वादग्रस्त आणि विवादित घटनांनी भरलेला आहे. १९७१ साली बांगलादेशाच्या स्वातंत्र्य संग्रामादरम्यान, जमात-ए-इस्लामीने पाकिस्तानच्या बाजूने भूमिका घेतली आणि त्याचा परिणाम बांगलादेशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मोठ्या प्रमाणात हिंसाचारात झाला. बांगलादेशातील अनेक व्यक्तींनी या संघटनेवर मानवाधिकारांच्या उल्लंघनाचे आरोप केले आहेत.

## हिंदूंचा घटता टक्का

आजघडीला पाकिस्तानातील हिंदूंची संख्या १९५० मध्ये ८ ते ९ टक्के होती. ती आज ५ लाखांवर म्हणजे एक टक्क्यांहून कमी झालेली आहे. बांगला देशात फाळणीच्यानंतर १९५० मध्ये २४ ते २५% हिंदू होते, २०११च्या जनगणनेनुसार बांगला देशात आज केवळ ८.६ टक्के हिंदूच शिल्लक उरले आहेत. १९७१ च्या युद्धात झालेला ३५-४० लाख हिंदूंचा वंशविच्छेद अमेरिकन पत्रकार गॅरी बासला जगासमोर आणावा लागला. अमेरिकन ज्यू व मानतावादी कार्यकर्ता डॉ. रिचर्ड बेन्कीन बांगलादेशातील

**ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त)**

अल्प संख्याकांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर वैचारिक व कायदेशीर मार्गाने लढतोय. भारतातील तथाकथित पुरोगामी, सेक्युलर्स, मानवतावादी, बुद्धीवादी विचारवंत बांगला देशात होणाऱ्या हिंदू-बौद्ध हत्याकांडाविषयी काही अपवाद वगळता गप्प का बसतात? भारतातील बुद्धिवंतानी आपल्या शेजारच्या देशात होणाऱ्या मानवी अधिकाराच्या पायमल्लीविषयी घटनात्मक मार्गाने जनजागृती करणे गरजेचे आहे.

बांगलादेशातील हिंदूंनी २२ लक्ष एकर मालमत्ता गमावली. भारतात स्थलांतरित झालेल्यांची संपत्ती बांगलादेश सरकारने ताब्यात घेतली. पाकिस्तानने १९६५च्या युद्धादरम्यान भारतीयांना शत्रू घोषित करून 'शत्रू संपत्ती निर्बंध १९६५; लागू करून भारतीयांची (मुख्यत्वे करून हिंदू व बौद्धांची) पूर्व व पश्चिम पाकिस्तानात असलेली संपत्ती ताब्यात घेतली. बांगलादेशच्या राज्यघटनेप्रमाणे भारत हा त्यांचा शत्रू राष्ट्र नाही, तरीही भारतीयांची किंवा भारतात स्थलांतरित झालेल्यांची संपत्ती बांगलादेश सरकारने ताब्यात घेतली.

ढाका विद्यापीठाचे प्रा. अबुल बरकत यांनी 'An Inquiry into Causes and Consequences of Deprivation of Hindu Minorities in Bangladesh through the Vested Property Act' ह्या पुस्तकातून Vested Vested Property Act द्वारे हिंदूंच्या जमीन चोरीचे व अन्यायाचे पुराव्यासकट अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. त्यानुसार, बांगलादेशातील ४० टक्के हिंदू कुटुंबे बाधित झाली आहेत. त्यात जवळपास ७.५ लक्ष शेतीवंचित कुटुंबे समाविष्ट होती. परिणामी हिंदू कुटूंबांनी गमावलेल्या एकूण जमिनींचा अंदाज १६.४ लक्ष एकर इतका आहे, जी हिंदू समाजाच्या मालकीतील एकूण जमिनीच्या ५३ टक्के व बांगलादेशाच्या एकूण भूमीच्या ५.३% आहे.

दुसरीकडे बांगलादेशी घुसखोरी हा कॅन्सर गेल्या काही वर्षांमध्ये भारतापुढील आव्हान ठरत आहे. भारताची साडेचार हजार किलोमीटरची सीमा बांगलादेशाशी जोडलेली आहे. सिलिगुरी कॉरिडॉरमध्ये घुसखोरी करून ईशान्य भारत मुसलमान बहुल करण्याचे प्रयत्न भारताच्या स्वातंत्र्यापासून चालू आहेत. आसामचे स्वातंत्र्यसैनिक आणि पूर्व मुख्यमंत्री गोपीनाथ बोर्डोलोई यांनी ईशान्य भारताचा प्रदेश पाकिस्तानला देण्याच्या विरोधात लढा उभा केला. त्यामुळे आज ईशान्य भारताची ७ राज्ये भारताचा भाग आहेत. बांगलादेशींच्या घुसखोरीचा मुद्दा आसामसाठी अतिशय संवेदनशील असून, त्यावरून अनेकदा हिंसक वादही या राज्यात होत असतात.

आसामची लोकसंख्या ३ कोटी आहे व बंगालची लोकसंख्या ९-१०कोटी आहे. या राज्यातील घुसखोरांचा आकडा कोटींच्या घरात असेल. या घुसखोरांमुळे या दोन्ही राज्यातील भूमिपुत्रांना रोजगार आणि कायदा सुव्यवस्थेच्या अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे.

चालू वर्षी मे महिन्यामध्ये बांगलादेशच्या खासदाराची नुकतीच कोलकाता येथे हत्या झाली. तपासानंतर संबंधित हल्लेखोर हा बांगलादेशी घुसखोर असल्याचे निष्पन्न झाले. बांगलादेशमधील समुद्री चाचे किंवा दरोडेखरांनी भारतातील सुंदरबनमध्ये येऊन पश्चिम बंगालच्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवरही हल्ला केला होता. पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर शस्त्रास्त्रांची, दारूगोळ्याची तस्करी, घूसखोरी आणि इतर गुन्हेगारीमुळे किनार्यालगतचे महत्त्वाचे उद्योग, संरक्षण आस्थापनांना, सीमापारच्या अवैध हालचालींपासूनचा धोका आहे. शस्त्रे, स्फोटके, खोट्या नोटा ज्याचा वापर या भागात स्थायिक झालेले बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोर करतात. मतदानाच्या दिवशी अनेक बांगलादेशी हे बांगलादेशची हद्दपार करून भारतात येतात आणि मतदान करतात. कारण त्यांच्याकडे भारताचे मतदान ओळखपत्र आहे. सरकारने मतदार ओळखपत्र आणि आधार हे जोडले गेले पाहिजे असा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे एका माणसाला एकाच ठिकाणी मतदान करता येईल. दुर्दैवाने या निर्णयावरती अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे अनेक बांगलादेशी हे दोन किंवा तीन ठिकाणी जाऊन मतदान करतात.आज बाकीच्या भारताचा विचार करता बांगलादेशी घुसखोरांची संख्या ही कमीत कमी चार ते पाच कोटी इतकी आहे. आसामप्रमाणे महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये बांगलादेशी घुसखोरांना नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझनशिपप्रमाणे शोधून काढले पाहिजे आणि त्यांना शोधून लगेच परत पाठवले पाहिजे. राजकीय इच्छाशक्ती आणि कठोर अंमलबजावणी केल्यास बांगलादेशी घुसखोरीचा हा कर्करोग समूळ नष्ट होऊ शकतो. त्याचबरोबर बांगला देशातील हिंदूंचे संरक्षण व्हावे ह्यासाठी भारताने सरकारी पातळीवरून किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरून बांगलादेशवर दडपण आणणे जरुरी आहे.




**पंचांग**

**सोमवार, दिनांक ३० डिसेंबर २०२४.** मार्गशीर्ष कृ. ३०, मूळ, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, उत्तरायण, हेमंत ऋतू. दर्शवेळा सोमावती अमावस्या, उ. रात्री ३.५६ पर्यंत. **नक्षत्र :** मूळ, योग : वृद्धि, करण : चतुष्पाद **सूर्योदय** : स.०६.५२, सूर्यास्त : सायं.०५.४० वा.
**राहू काळ : सकाळी : ७:३० ते ९:००**

**दिनविशेष**

▶१६६१ : वायूचा दाब, तपमान आणि आकुंचन, प्रसरणाचे नियम शोधणाऱ्या रॉबर्ट बॉईलचा मृत्यू. ▶१८७९ : एक आधुनिक दक्षिण भारतीय संत रमण महर्षी यांचा जन्म. ▶१८८७ : भारतीय विद्याभवन या संस्थेचे संस्थापक, शिक्षणतज्ज्ञ कन्हैयालाल मुन्शी यांचा जन्म. ▶१९४१ : इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार यांचा जन्म. ▶१९४३ : नेताजी सुभाषचंद्र बोसनी अंदमान आणि निकोबारची राजधानी पोर्ट ब्लेर येथे पहिल्यांदा स्वतंत्र भारताचा ध्वज फडकविला. ▶१९७१ : भारतीय अवकाशविज्ञान संस्थेचा पाया घालणारे विक्रम साराभाई निवर्तले. ▶१९९२ : महाराष्ट्रातील मराठी शाहिरी परंपरेतील एक बुलंद व प्रतिभासंपन्न आवाज असलेले शाहिरतिलक पिराजीराव रामजी सरनाईक यांचे निधन. ▶१९९३ : प्रसिद्ध अभिनेत्री नर्गीस दत्त यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकीट प्रकाशित. ▶१९९८ : जिम्नॅस्टिकचे प्रशिक्षक व माजी राष्ट्रीय खेळाडू राजेंद्र निळकंठ निजामपुरकर यांचे निधन. ▶२००१ : हर्षद मेहता या शेअर गैर-व्यवहारातील आरोपीचे निधन. ▶२००३ : अवकाशातील वादळांचा मागोवा घेण्यासाठी चीनने 'प्रोब-१' नावाचा उपग्रह अवकाशात सोडला.

**राशीभविष्य**

▲**मेष** : नवी जबाबदारी स्वीकाराल. ▲**वृषभ** : प्रतिष्ठा वाढेल. ▲**मिथुन** : हितचिंतक मदत करतील. ▲**कर्क** : तणाव कमी होईल. ▲सिंह : नको त्या कामात वेळ जाईल. ▲**कन्या** : विनाकारण खर्च होईल. ▲**तुळ** : नवे अनुभव घ्याल. ▲**वृश्चिक** : भागीदाराच्या कलाने वागाल. ▲**धनु** : हितशत्रूंपासून सावध रहा. ▲**मकर** : रागांवर नियंत्रण ठेवा. ▲**कुंभ** : खाण्यापिण्यावर बंधन ठेवा. ▲**मीन** : कामात गुप्तता राखा.

**चिंतन**

आपल्या राष्ट्राच्या सांस्कृतिक प्रतिभेपासून जी व्यक्ती लांब राहते, ती पर्यायाने स्वत:पुढेच अडथळे निर्माण करीत असते. अशा प्रकारे नागरिक दुबळे असताना, देश कधीही शक्तिशाली होऊ शकत नाही.
– पंडित जवाहरलाल नेहरु

**व्यक्तीविशेष**

## रुडयार्ड किपलिंग

जोसेफ गुडयार्ड किपलिंग हा गेल्या शतकातील नावाजलेला ब्रिटिश लेखक आणि कवी. जंगलबुक या प्रसिद्ध पुस्तकाचे ते लेखक. त्यातील मोगली ही व्यक्तीरेखा आजही आबालवृद्धांच्यात लोकप्रिय आहे. किपलिंग यांचा जन्म मुंबईत ३० डिसेंबर १८६५ रोजी झाला. त्यांचे आई-वडिल जन्माने ब्रिटीश असले तरी स्वत:ला ॲंग्लो इंडिय समजत. रुडयार्ड किपलिंग यांचे जंगलबुक हे पुस्तक १९९४ मध्ये प्रकाशीत झाले. त्यांनी काही कथासंग्रहही लिहिले, त्यात 'किम', 'द मॅन हू वुड बी किंग' हे त्यांचे गाजलेले कथासंग्रह. कपलिंग कवीही होते. मंडाले, गंगादिन आणि इफ हे त्यांचे गाजलेले कवितासंग्रह. त्यांना लघुकथालेखनाचा उद्गाता मानले जाते. किपलिंग अतिलोकप्रिय लेखक होते. १९७० मध्ये त्यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला. नोबेल पुरस्कार मिळालेले ते पहिले ब्रिटीश लेखक. त्याचबरोबर नोबेल पुरस्कार मिळवणारे ते सर्वात तरुण लेखक होते. ब्रिटिश साम्राज्यवादाचे ते पुरस्कर्ते होते; पण जसजसा साम्राज्यवादाचा ऱ्हास होत गेला, तसतशी किपलिंग यांच्या साहित्याकडे पाहण्याची दृष्टीही बदलत गेली. किपलिंग वादग्रस्त असले तरी अतुलनीय लेखक मानले जातात. त्यांच्याकडे कथनाची विलक्षण शैली होती. १८ जानेवारी १९३६ रोजी लंडन येथे त्यांचे निधन झाले.

**बोधकथा**

## भुरळ मोठेपणाची

एका अरण्यात एक धष्टपुष्ट हत्ती होता. त्या अरण्यातील कोल्ह्यांनी हात्तीला पाहून विचार केला, काही तरी युक्ती करून आपण या हत्तीला मारले पाहिजे. म्हणजे आपल्याला बरेच महिने अन्नाचा तुटवडा भासणार नाही. एवढ्या मोठ्या हात्तीसमोर आपण समोरासमोर लढून जिंकणार नाही. हे माहित असल्यामुळे त्यांनी दुसरा मार्ग शोधण्याचे ठरवले. एका वृद्ध कोल्ह्याने सल्ला दिला, 'तुम्ही काही काळजी करू नका. मी युक्तीने त्याला आपल्या जाळ्यात ओढतो.' मग हा कोल्हा हत्तीकडे गेला आणि त्याला वाकून नमस्कार केला. त्याला म्हणाला, महाराज आम्ही गरीब आहोत, शक्तीहीन आहोत. तेव्हा आमच्यावर कृपा करा. हत्तीने विचारले, 'तू कोण आहेस?' कोल्हा हात जोडून म्हणाला, या अरण्यातील सर्व प्राण्यांचा मी प्रतिनिधी आहे. आम्हाला सर्व काही आहे पण राजा नाही. तुम्ही गुणवान, शक्तीमान, पराक्रमी आहात तेव्हा पशुंचा राजा होण्याची क्षमता तुमच्याकडेच आहे म्हणून आम्ही सारेजण तुमचा राज्याभिषेक करणार आहोत. सर्व तयारी झाली आहे.' **(पूर्वार्ध)**

**जिज्ञासा**

## वेदनाशामकांचा शोध

गंमत म्हणजे १८९९ पर्यंत ॲस्पिरिनचा वापर कोणी करत नव्हते. त्याचे गुण तोपर्यंत समजले नव्हते. बेअर कंपनीचे प्रमुख डॉक्टर ड्रेसर यांच्या मतानुसार औषध किती प्रमाणात वीज वाहक आहे यावर ते गुणकारी ठरेल की नाही हे ठरवले जात असे आणि दुर्दैवाने ॲस्पिरीन हे विजेचे दुर्वाह होते त्यामुळे ते गुणकारी ठरणार नाही. या विचारातून त्यावर बंदी घातली होती. पण त्यांच्याच कंपनीतील प्रमुख औषध निर्माता आर्थर आयशेनग्रुन याला मात्र हा विचार पटला नव्हता. त्यांनी या औषधाची पुन्हा तपासणी केली त्याचे निरनिराळ्या माणसांवर आणि स्वतःवरही प्रयोग केले. या प्रयोगातून हे औषध डोकेदुखी आणि संधीवात यावर उपयोगी पडते हे दाखले. स्पायरिंग नावाच्या झाडात सॉलीसायलेट असते त्यावरून ॲस्पिरीन हे नाव त्याने या औषधाला दिले. पण याचे श्रेय मात्र आर्थरला मिळाले नाही. त्याचा मालक ड्रसेर याने या औषधावर बराच पैसा कमावला. **(उत्तरार्ध)**

**सामान्यज्ञान**

## प्रशांत महासागर

प्रशांत महासागर हा जगातील सर्वात मोठा समुद्र आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा ३२ टक्के भाग हा प्रशांत महासागराने व्यापलेला आहे. प्रशांत महासागराचे एकूण क्षेत्रफळ १.६९२ कोटी वर्ग किलोमीटर इतके आहे. म्हणजेच अटलांटिक महासागराच्या जवळपास दुप्पट आहे. तर कमाल खोली १०९११ मीटर इतकी आहे. प्रशांत महासागराच्या पूर्वेकडील आणि पश्चिम तसेच उत्तरेकडील भूभागामध्ये अनेक ज्वालामुखींचा उद्रेक होताना दिसतो. या भागामध्ये ३०० ज्वालामुखी पर्वतही आहे. त्याचबरोबर या महासागरामध्ये ज्वालामुखीच्या उद्रेकाने काही बेटेही तयार झालेली आहेत.

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५४५**


| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| 3 | | 1 | |
| | 1 | | 4 |
| | | | |

**क्रमांक ५४४ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 4 | 2 | 3 |
| 2 | 1 | 3 | 4 |
| 3 | 2 | 4 | 1 |
| 4 | 3 | 1 | 2 |

**हास्यविनोद**

बंड्याच्या बायकोचा दात दुखत असतो. ती खूप रडत असते.
**बंड्या वैतागून)** : हा जर माझा दात असता ना तर मी कधीच उपटून टाकला असता.. वैताग सगळा.
**बंड्याची बायको** : होय. हा जर तुमचा दात असता ना तर मीच आधी पाडला असता.




**गुंडोपंत** : मित्रा, माझी पत्नी हरवलीय.
**बंडोपंत** : पेपरमध्ये जाहिरात दे. पोलिस स्टेशनला नोंद कर.
**गुंडोपंत** : हा उपद्व्याप कशाला करू. मी तर खुश आहे बुवा. मला तर आनंदाच्या भारत कुठे जाऊ कुठे नको असं झालंय.

# अनोखा ७ वा अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव !



पुणे ही सांस्कृतिक नगरी आहे यात, गायन, चित्रपट, नाटकाला मोठा इतिहास आणि महत्व आहे !! 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता', जिकडे स्त्री ची पूजा केली जाते तिकडे सर्व देव वास करतात! 'ती' २१ व्या शतकात फ्री बर्ड आहे अशा धाटणीचा सिनेमा ७ वा अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये नुकताच पाहण्यात आला, ७ वा अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव नुकताच पुण्यात पार पडला सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या सहयोगाने २०१७ पासून ते आजपर्यंत म्हणजेच गेली ७ वर्षे, अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आयोजित होत आहे .



**तन्मयी मेहेंदळे, पुणे**

महाराष्ट्राची सांस्कृतिक जडणघडण करण्यामध्ये अनेकांनी प्रयत्न केले. त्यापैकी एक महत्वाचे व्यक्तिमत्व म्हणजे अण्णाभाऊ साठे अष्टपैलू व्यक्तिमत्व असणाऱ्या अण्णाभाऊंनी शोषितांच्या बाजुने सांस्कृतिक क्षेत्रात ठसा उमटवला. साहित्यिक म्हणून अण्णाभाऊ साठे अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे होते. अण्णाभाऊ हे कलाकार चित्रपटकथाकार, दिग्दर्शक, चित्रपट समिक्षक, प्रेक्षक आदी स्वरूपांमध्ये पाहायला मिळतात . माकडीचा माळ या कादंबरीवर "डोंगरची मैना; चिखलातील कमळ यावर मुरळी मल्हाररायाची; वारणेचा वाघ या कादंबरीवर वारणेचा वाघ, वैजयंतावर वैजयंता आवडी या कादंबरीवर टिळा लाविते मी रक्ताचा, आलगूज या कादंबरीवर अशी ही साताऱ्याची तऱ्हा, फकिरावर फकीरा आणि चित्रा कादंबरीवर चित्रा हा चित्रपट निघाला होता .

यंदाच्या महोत्सवात एकूण ७७ चित्रपट ३ दिवसीय महोत्सवात दाखवण्यात आले काही मराठी हिंदी आणि देशातील अनेक भाषांमधील होते आशय, लिखाण, दिग्दर्शन निर्मिती अतिशय उत्तम असणारे हे चित्रपट समाजातील सांस्कृतिक, सांगीतिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि ग्रामीण विषयांवर भाष्य करणारे होते, स्त्री वाडी चित्रपटही पुणेकर रसिकांना आणि चित्रपट चाहत्यांना पर्वणीच ठरले, पुरिया, स्पिरोंज, बुब्रा, स्टेटस, गोंधळ, द बलून अश्या काही आणि अशासारख्या अनेक विषयावर उत्तम भाष्य करणाऱ्या सिनेमांनी पुणेकर रसिकांची मने जिंकली .दरवर्षी प्रमाणे निळू फुले पुरस्कार यंदाही आकर्षण ठरले आहे, संदीप सणस यांच्या अयोजानाखाली गेली ७ वर्ष अविरतपणे हा चित्रपट महोत्सव सुरु आहे यास अनेक शुभेच्छा देते आणि मराठीसह देशातील चित्रपटास अच्छेदिन खरच आले असे मानते !

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## राज्यभरातून हजारो भाविकांची हजेरी; संत नामदेवांच्या पादुकांचे पूजन

# समाधी वर्णन कीर्तनाने सासवडनगरी गहिवरली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सासवड (ता. पुरंदर) येथे श्री संत सोपानदेव महाराज संजीवन समाधी सोहळा सुरू असून शुक्रवार (दि. २७) संध्याकाळी नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प केशव महाराज नामदास (पंढरपूर) यांचे नामदेव महाराजांच्या पादुकांसह सोपानदेव मंदिरात आगमन झाल्यानंतर पादुकांचे पूजन व आरती झाली. सोपानदेवांच्या नावाचा जयघोष, टाळ्यांचा कडकडाट आणि टाळ मृदूंगाचा अखंड गजर करत समाधीवर फुलांची पुष्पवृष्टी करण्यात आली.

दरम्यान, शनिवार (दि.२८) अर्थात मार्गशीर्ष वद्य १३ हा संत सोपानदेव समाधी सोहळ्याचा प्रमुख दिवस असल्याने पहाटे काकडा आरती घेण्यात आली. त्या नंतर सोपानदेव समाधी आणि नामदेव महाराज पादुकांची महापूजा करून दिंडी प्रमुखांच्या वतीने अभिषेक घालण्यात आले. यानिमित्त मंदिरात फुलांची मोठी आरास करण्यात आली. सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प.केशव महाराज नामदास (पंढरपूर) यांचे समाधी वर्णनाचे कीर्तन झाले. या प्रसंगी संत सोपानदेव महाराज यांचा जीवनपट उलगडून दाखविताना उपस्थितांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. यावेळी पुरंदर तालुक्यासह राज्यातील हजारो भाविकांनी कीर्तनाचा लाभ घेतला, टाळ मृदुंगाच्या गजरात 'पुंडलिक वरचे हरी विठ्ठल'चा जयघोष झाला. दुपारी १२:३० वा. उपस्थित भाविकांनी समाधीवर पुष्पांचा वर्षाव करून आरती घेण्यात आली.




सासवड येथे ह.भ.प.केशव महाराज नामदास (पंढरपूर) यांचे समाधी वर्णनाचे कीर्तन झाले दुसऱ्या छायाचित्रात संत सोपानदेव समाधी

रविवार (दि.२९) भोपळे दिंडी क्रमांक १४ (मरकळकर) माऊली रथापुढे यांच्या वतीने काल्याचे किर्तन नंतर दहीहंडी व दिंडी प्रदक्षिणा होईल अशी माहिती सोपानदेव देवस्थानचे मुख्य विश्वस्त ॲड त्रिगुण गोसावी यांनी दिली.

दुपारी १ वाजता भाविक भक्तांना पुरंदर तालुक्यातील नवी मुंबईस्थित रहिवासी असलेल्या अंजीर सहकार मंडळाकडून महाप्रसाद देण्यात आला. दुपारी ३ ते ४ वाजता सोपानदेव देवस्थानच्या वतीने प्रवचन तर सायंकाळी ५ वाजता वारकऱ्यांच्या वतीने भजन व हरिपाठ झाला रात्री ८ वाजता वारकऱ्यांच्या वतीने श्री संत नामदेव महाराज यांनी रचलेल्या सोपान महाराज यांच्या समाधी वर्णनाचे अभंग म्हणतील नंतर मंदिर प्रदिक्षणा घेण्यात आली. तर रात्री बाळकृष्णबुवा दिंडीचा जागरचा कार्यक्रम झाला. अशी माहिती सोपानदेव देवस्थानचे मुख्य विश्वस्त ॲड त्रिगुण गोसावी यांनी दिली. यावेळी देवस्थांनचे व्यवस्थापक हिरुकाका गोसावी, गोपाळ गोसावी, चोपदार सिद्धेश शिंदे, चोपदार मनोज ननवरे, ह.भ.प.अभय महाराज जगताप, अमित पवार उपस्थित होते.

## गरम कपड्यांना मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** यंदा पडलेल्या कडाक्याच्या थंडीमुळे गरम कपड्यांना चांगली मागणी होत आहे. आंबेगाव तालुक्यात मध्यप्रदेश राज्यातून शेकडो तरुण ब्लँकेट, चादर, गरम कपड्यांच्या विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्यांच्याकडून नागरिक मोठ्या प्रमाणावर गरम कपडे खरेदी करत आहेत. त्यातून त्यांना चांगला रोजगार देखील मिळत आहे.

गेल्या चार-पाच वर्षांमध्ये दरवर्षी थंडीच्या दिवसांमध्ये मध्य प्रदेश राज्यातून गरम कपडे विक्रीच्या व्यवसायासाठी शेकडो तरुण आंबेगाव, जुन्नर तालुक्यात दाखल होतात. नारायणगाव (ता. जुन्नर)येथे ते दोन तीन महीने वास्तव्यास असतात. दुचाकीवरच शेकडो कपड्यांचे नग रचून ते



मध्यप्रदेश राज्यातील तरुण व्यवसायिक. (छाया: रोहीत खुडे).

गावागावांमध्ये,वाडी वस्त्यांमध्ये फिरून ते गरम कपड्यांची विक्री करतात. दुचाकीमुळे त्यांना खर्च कमी येतो.

गरम कपडे विक्रीतून त्यांना चांगली कमाई होत आहे. या भागात जानेवारी महीन्यापासून गावोगावच्या यात्रा जत्रांना सुरुवात होते. मे महिन्यापर्यंत यात्रा हंगाम असतो. या तीन-चार महिन्यांमध्ये या व्यवसायिकांना चांगला धंदा मिळतो.

## सगुणाबाई ताकवले यांचे निधन

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील हरगुडे गावच्या पळसबिंद वस्तीवरील सगुणाबाई संपतराव ताकवले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. धार्मिक व दयाळू स्वभावाने त्यांनी अनेकांना उत्तम संस्कार दिले होते. त्या ९० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी सुना, नातवंडे असा परिवार आहे. उरुळीकांचन येथील बाएफ संशोधन संस्थेचे संचालक प्रमोद व खाजगी कंपनीत कार्यरत राम ताकवले यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या निधनाने हरगुडे गावात दुःखाचे वातावरण झाले.



## ढगाळ हवामानाचा गव्हाला फटका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** सततच्या ढगाळ हवामानाचा फटका आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गहू पिकाला मोठ्या प्रमाणावर बसला आहे. गव्हाचे पीक ओंबीवर आले असताना, सततचे ढगाळ हवामान गव्हाला घातक ठरले. तांबेरा, काळा मावा, करपा या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर गव्हावर झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

गेले पाच-सहा दिवसांपासून तालुक्याच्या पूर्व भागात ढगाळ हवामानाचे सावट निर्माण झाले आहे. या परिसरात सूर्यदर्शन देखील होत नाही. सुरुवातीपासूनच यंदा गव्हाला पोषक हवामानाची साथ मिळाली. कडाक्याच्या थंडीचा गव्हाला चांगला फायदा झाला.



सततच्या ढगाळ हवामानामुळे गहू पिकावर तांबेरा,काळा मावा रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. नागापूर (ता. आंबेगाव) येथील चित्र.

परंतु गव्हाचे पीक ओंबीवर आले असतानाच, वातावरणातील थंडीचे प्रमाण अचानक कमी होऊन ढगाळ हवामान निर्माण झाले आहे.

अनेक शेतकऱ्यांच्या गव्हाच्या शेतामध्ये गहू पिकावर तांबेरा, काळा मावा, करपा या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसत आहे. अजूनही ढगाळ हवामानाचे सावट कायम आहे. ढगाळ हवामानाचे सावट पुढे कायम राहिले तर गव्हाचा उत्पादनावर त्याचा परिणाम होईल, अशी भीती गहू उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# अभिवादनसाठी येणाऱ्या अनुयायींना सर्व सुविधा पुरवा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** येथे १ जानेवारी २०२५ रोजी आयोजित विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याकरीता येणाऱ्या अनुयायींना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने चोख व्यवस्था करत अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायींना सर्व सुविधा पुरावा तसेच दरवर्षी त्याच त्याच सुविधा पुन्हा कराव्या लागत असल्याने कायमस्वरुपी सुविधा तयार करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करा असे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी प्रशासनाला दिले आहे.

कोरेगाव भीमा ता. शिरुर सह पेरणे येथे होणाऱ्या विजयस्तंभ



**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा विजयस्तंभ येथे भेट देत आढावा घेताना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व आदी.

अभिवादन कार्यक्रमाच्या तयारी पूर्ण होत असताना सदर सह पेरणे येथे होणाऱ्या विजयस्तंभास अभिवादन कार्यक्रमाचा आढावा नुकताच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी घेतला यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर, हवेलीचे उपविभागीय अधिकारी यशवंत माने, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, कोरेगाव भीमा विजयस्तंभ सेवा संघाचे अध्यक्ष सर्जेराव वाघमारे, भूषण गायकवाड, युवराज बनसोडे, विवेक बनसोडे यांसह आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना येथे अनुयायांच्या संख्येत दरवर्षी वाढ होत असून येणाऱ्या अनुयायांना शासनामार्फत आरोग्य सेवा देताना अन्य संस्थांनी त्यामध्ये सहभाग घेण्यासाठी प्रयत्न करावेत. पोलीस विभागावर बंदोबस्ताची मोठी जबाबदारी असल्याने शासनाच्या सर्व विभागांनी त्या ठिकाणी केलेल्या आपल्या सुविधांची व कामाची माहिती पोलीसांना तसेच एकमेकांना उपलब्ध करुन द्यावी. कार्यक्रम चांगल्या रितीने संपन्न होईल यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे असेही सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले. यावेळी जिल्हा प्रशासनाने विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या अनुषंगाने केलेल्या तयारीबाबत समाधान व्यक्त करत कार्यक्रमासाठी दरवर्षी पार्किंगसाठी खासगी जागा ताब्यात घेणे, सपाटीकरण करणे यावर मोठा खर्च होत असतो. त्यामुळे या कार्यक्रमाच्या अनुषंगाने शासकीय जागा उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करुन सदर परिसरात शासकीय दवाखाना, विश्रांतीकक्ष उभारण्यासाठी प्रयत्न करावे आणि विजयस्तंभाच्या बाजूच्या जागेबाबत न्यायालयीन वाद सुटण्याच्या दृष्टीने उच्च न्यायालयात चांगला वकील नेमून प्रयत्न करावा असे देखील सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

## दुचाकीस्वाराचा मृत्यू

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथील पुणे नगर महामार्गावरुन विष्णू पुरी हे त्यांच्या ताब्यातील एम एच १२ बी एफ २८१२ या दुचाकीहून आळंदी कडे चाललेले असताना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाची विष्णू यांच्या दुचाकीला धडक बसून विष्णू गंभीर जखमी होऊन रस्त्यावर पडले दरम्यान नागरिकांनी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी विष्णू गोपीचंद पुरी वय ५५ वर्षे रा. टाकळी हाजी ता. शिरुर यांचा उपचारापुर्वी मृत्यू झाल्याचे घोषित केले, याबाबत सविता विष्णू पुरी यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार दामोदर होळकर हे करत आहे.

## करंदीत बिबट्यांचा मुक्तसंचार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** करंदी येथील झेंडे वस्ती व नप्ते वस्ती परिसरात दोन बिबट्या घराच्या अंगणात येऊन कुत्र्यावर हल्ला करताना सीसीटीव्ही मध्ये कैद झालेले असताना परिसरात दोन बिबट्यांचा मुक्त संचार दिसून आल्याने वनविभागाने खबरदारी घेत तातडीने बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावला आहे.

करंदी येथील झेंडे वस्ती येथे राहुल ढोकले यांच्या घराच्या बाहेर २६ डिसेंबर रोजी रात्री तीन वाजण्याच्या सुमारास कुत्र्याचा भुंकण्याचा आवाज आल्याने राहुल यांनी घराबाहेर पाहिले असता, दोन बिबटे दारासमोरील पायरी समोर असल्याचे दिसले. त्यानंतर सीसीटीव्ही तपासले असता सर्व प्रकार समोर आला, याबाबतची माहिती शिरूर वनविभागाच्या वनपरिमंडल अधिकारी गौरी हिंगणे यांना मिळताच, वनपरिक्षेत्र वनअधिकारी बबन दहातोंडे, वनमजूर आनंद हरगुडे, रेस्क्यू टीमचे गणेश टिळेकर, शेरखान शेख, अमोल कुसाळकर यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत पाहणी करुन नागरिकांची मागणी लक्षात घेता तातडीने पिंजरा लावला. यावेळी पोलीस पाटील वंदना साबळे, सामाजिक कार्यकर्ते राहुल ढोकले, महेश साबळे पाटील, समीर ढोकले, गणेश झेंडे, सुनील ढोकले, सोमनाथ सातपुते, अभिजित पऱ्हाड, अरुण सातपुते यांसह आदी उपस्थित होते. २७ डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास बिबट्याने पुन्हा कांताराम नप्ते यांच्या घरासमोर फेरफटका मारल्याचे दिसून आल्याने खळबळ उडाली आहे.

दरम्यान, परिसरातील नागरिकांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी, मुलांना बाहेर एकटे सोडू नये, शेतात जाताना आवाज करावा, जनावरांना योग्य निवारा करावा, घराबाहेर लाईत चालू ठेवावी असे आवाहन नियतक्षेत्र वनअधिकारी बबन दहातोंडे यांनी केले आहे.



करंदी येथे सीसीटीव्हीमध्ये कैद बिबट्यांचा मुक्त संचार व वनविभागाने लावलेला पिंजरा.

» Selected

## जवळे येथील ऋषिकेश खालकरचे सीए परिक्षेत यश

**लोणी-धामणी :** जवळे (ता. आंबेगाव ) येथील ऋषिकेश संजय खालकर याने आपल्या परिस्थितीवर मात करीत जिद्द व चिकाटी, मेहनतीच्या जोरावर सीएच्या (सनदी लेखापाल) परिक्षेत यश मिळवले. पहिल्याच प्रयत्नात सीएची परिक्षा पास झाल्याबद्दल जवळे आणि निरगुडसर परिसरात त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



लहानपनापासून अभ्यासात हुशार असलेल्या ऋषिकेशचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद जवळे व पुढील शिक्षण पंडीत जवाहरलाल नेहरू माध्यमिक व द.गो.वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय निरगुडसर येथे पूर्ण केले. अकरावी, बारावी,बी.कॉम व एम.कॉमचे शिक्षण मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स पुणे येथे झाले.एम.कॉम करत असतानाच त्याने सीएचा अभ्यास केला.आणि वयाच्या पंचविसाव्या वर्षी सीए होण्याचा मान मिळवून सीएला गवसणी घातली. व संपूर्ण देशात अवघड समजल्या जाणाऱ्या सीएची परिक्षा उतीर्ण होऊन ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श ठेवला. ऋषिकेशचे वडील शेतकरी असून शेतीला मदत म्हणून गॅस वितरण व्यवसाय करत आहेत.परस्थिती सर्वसाधारण असून सुद्धा मुलाला उच्च शिक्षण देण्याची त्यांची जिद्द होती आणि ती त्यांनी पूर्ण केली. यासाठी त्यांची पत्नी सुरेखा हिने सुद्धा मुलाला मोठे करण्यासाठी आपल्या पतीला मोलाची साथ दिली. ऋषिकेशला मिळालेल्या यशाबद्दल माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, जेष्ठ नेते प्रतापराव वळसे पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्याक्ष विवेक वळसे पाटील, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्याक्ष ॲड. प्रदिप वळसे पाटील व गावचे सरपंच, उपसरपंच व विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## धानोरे जि. प. प्राथमिक शाळेचे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश



धानोरे ता. शिरुर शाळेतील यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक

**शिक्रापूर :** धानोरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने यशवंतराव चव्हाण कला व क्रीडा महोत्सवा अंतर्गत शिरूर तालुका पातळीवरील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये जि. प. प्राथमिक शाळा, धानोरे या शाळेच्या मुलांनी घवघवीत यश संपादन केले असल्याची माहिती मुख्याध्यापक शंकर शिंदे यांनी दिली आहे. धानोरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थांनी नुकत्याच पार पडलेल्या यशवंतराव चव्हाण कला व क्रीडा महोत्सवा अंतर्गत विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असता, राजनंदिनी सुभाष माशिरे या विद्यार्थिनीने धावणे या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक तर लांब उडी मध्ये दुसरा क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांनी पन्नास मीटर धावणे, लहान गटात मुलींनी प्रथम क्रमांक तर मुलांनी द्वितीय क्रमांक, लांब उडीमध्ये मुळे व मुलींच्या गटाने द्वितीय क्रमांक, उंचउडी मध्ये मुलींनी प्रथम तर मुलांनी द्वितीय क्रमांक, खो खो मध्ये लहान गटात मुलांनी व मुलींनी द्वितीय क्रमांक तसेच खो खो मध्ये मोठ्या गटातील मुलींनी तृतीय क्रमांक पटकावला असून, सर्व स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेले खेळाडूंची जिल्हा पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली. याबद्दल पदाधिकारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## चैतन्य विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**ओतूर :** येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवी मुंबई येथील चैतन्य इलेक्ट्रिकल्स अँड सिव्हिल लेबर कॉन्ट्रॅक्टर शिवाजी डुंबरे हे होते.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना गणेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, प्रवीण जाधव, गौरव वायकर, प्रकाश तांबे, अमित डुंबरे, सचिन तांबे,ह.भ.प.सर्जेराव गाढवे,गाडगे महाराज शिक्षण संस्थेचे नितीन पाटील,गजानन प्रसारक शिक्षण मंडळाचे मानद सचिव वैभव तांबे, शिवाजी डुंबरे यांचे १९८३ - ८४ एसएससी बॅचचे मित्रपरिवार,आदी उपस्थित होते. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने श्रीधर दाते, प्रकाश पा. डुंबरे, डॉ. मनोज सुतार, बबन डुंबरे, ज्ञानेश्वर पानसरे, विलास डुंबरे, सुधीर गायकर, प्रमोद ढमाले, कुंदन गावडे, भारती फापाळे, रामदास गिते, दामोदर पानसरे, निलेश देवकाते यांनी दोन हजार विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी केले. भाऊसाहेब खाडे यांनी सूत्रसंचालन केले, तर संतोष सोनवणे यांनी आभार मानले.

## पालेभाज्यांचे भाव गडगडले; एकूण उलाढाल ७ कोटी ५० लाख रुपये

# कांद्याची आवक घटली; भाव स्थिर; - गाजर, टोमॅटो, मिरचीची मोठी आवक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

» चाकण बाजारभाव

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये गाजर, टोमॅटो, वाटाणा व हिरव्या मिरचीची विक्रमी आवक झाली. पालेभाज्यांचे भाव गडगडले आहेत. कांद्याची आवक घटून भाव स्थिर राहिले. एकूण उलाढाल ७ कोटी, ५० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ६,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १,००० क्विंटलने घटली. कांद्याचा कमाल भाव ३,१०० रुपयांवर पोहोचला. बटाट्याची एकूण आवक २,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २५० क्विंटलने वाढली. बटाट्याचा कमाल भाव २,००० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक २३ क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २ क्विंटलने घटली. लसणाचा कमाल भाव २५,००० रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक १८० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ४ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. ओल्या भुईमुग शेंगांची



चाकण बाजारात गाजराची झालेली आवक. ( छाया - अविनाश दुधवडे, चाकण )

काहीच आवक झाली नाही.

**शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे –**

कांदा - एकूण आवक - ६,००० क्विंटल. भाव क्रमांक - १. ३,१०० रुपये, भाव क्रमांक २. २,२०० रुपये, भाव क्रमांक ३. १,५०० रुपये.

**बटाटा -** एकूण आवक - २,००० क्विंटल. भाव क्रमांक १. २,००० रुपये, भाव क्रमांक २. १,६०० रुपये, भाव क्रमांक ३. १,२०० रुपये.

**फळभाज्या -**

फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

**टोमॅटो -** २८४ क्विंटल ( ८०० ते १,२०० रू. ), कोबी - २२५ क्विंटल ( ६०० ते ८०० रू.), फ्लॉवर - २६० क्विंटल ( ३०० ते ५०० रु.), वांगी - ५६ क्विंटल ( १,५०० ते २,५०० रु.), भेंडी - ६२ क्विंटल ( २,००० ते ४,००० रु.), दोडका - १८ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), कारली - २८ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), दुधीभोपळा - २७ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), काकडी - ८४ क्विंटल ( १,००० ते १,५०० रु.), फरशी - ३२ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), वालवड - ३८ क्विंटल ( ३,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - ७२ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), चवळी - १६ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), शेवगा - ४ क्विंटल ( १०,००० ते १३,००० रु.), गाजर - ९० क्विंटल ( १,००० ते १,५०० रु.), गवार - १२ क्विंटल ( ५,००० ते ८,००० ), वाटाणा - २४५ क्विंटल ( ४,००० ते ५,०००), आले - ६४ क्विंटल ( २,००० ते ४,००० ).,

**पालेभाज्या -**

चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे -

मेथी - एकूण १६ हजार जुड्या ( ६०० ते १,००० रुपये ), कोथिंबीर - एकूण २५ हजार ३०० जुड्या ( २०० ते ४०० रुपये,), शेपू - एकूण ४ हजार १०० जुड्या ( ४०० ते ६०० रुपये ), पालक - एकूण २ हजार ९०० जुड्या ( ६०० ते ७०० रुपये),.

**जनावरे -**

चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ७० जर्शी गाईपैकी ५५ गाईची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), ११५ बैलांपैकी ९५ बैलांची विक्री झाली. ( १०,००० ते ४०,००० रु.), १८० म्हशीपैकी १६० म्हशींची विक्री झाली.( २०,००० ते ८०,००० रु.), १० हजार ५०० शेळ्या - मेंढ्यापैकी ९,००० शेळ्यांची विक्री झाली. ( २,००० ते १५,००० रु.),.

*कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ) वरील व्याज संबंधित कर नियमांमध्ये वर्ष २०२१ मध्ये एक मोठा बदल करण्यात आला. हा बदल प्रामुख्याने ईपीपीएफमध्ये मोठ्या प्रमाणात जमा करून करसवलतीचा लाभ घेत असलेल्या कर्मचाऱ्यांना लक्षात घेऊन करण्यात आला आहे. त्यानुसार जर एखाद्या कर्मचाऱ्याचे ईपीएफमध्ये वार्षिक योगदान २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त असेल, तर या अतिरिक्त रकमेवरील व्याज करपात्र आहे. त्यापूर्वी, ईपीएफवर मिळणारे संपूर्ण व्याज करमुक्त होते. हा बदल २०२१ च्या अर्थसंकल्पात घोषित करण्यात आला आणि १ एप्रिल २०२१ पासून लागू झाला होता. या नियमानुसार, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी दोन खाती तयार करतात. २.५ लाख रुपयांपर्यंतची रक्कम आणि त्यावर मिळणारे व्याज पहिल्या खात्यात ठेवले जाईल, जे पूर्णपणे करमुक्त असेल. २.५ लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम आणि त्यावर मिळणारे व्याज दुसऱ्या खात्यात ठेवले जाईल, जे करपात्र असेल. हे करपात्र व्याज कर्मचाऱ्यांच्या एकूण उत्पन्नात जोडले जाईल आणि त्यांच्या कर स्लॅबनुसार कर आकारला जाईल.*

# ईपीएफवरील उत्पन्नावरील करचे अर्थगणित




### • टीडीएसची तरतूद

२०२१ मध्ये बदललेल्या नियमानुसार, कर्मचाऱ्याचे करपात्र व्याज ५,००० रुपयांपेक्षा जास्त असल्यास, त्यावर टीडीएस (टॅक्स डिडक्टेड ॲट सोर्स) कापला जाईल. जर पॅन कार्ड लिंक केले असेल तर टीडीएस दर १०% असेल, तर जर पॅन कार्ड लिंक नसेल तर दर २०% असेल.

### • कराची गणना कशी केली जाते?

समजा, एखाद्या कर्मचाऱ्याचे वार्षिक योगदान ४ लाख रुपये आहे आणि ईपीएफवर ८% व्याजदर आहे. २.५ लाख रुपयांच्या पहिल्या योगदानावर २०,००० रुपयांचे व्याज करमुक्त असेल. १.५ लाख रुपयांच्या उर्वरित योगदानावरील १२,००० रुपयांचे व्याज करपात्र असेल. हे करपात्र व्याज कर्मचाऱ्यांच्या एकूण उत्पन्नात जोडले जाईल आणि त्यांच्या कर स्लॅबनुसार कर आकारला जाईल.

### • जुन्या आणि नवीन करातील फरक

नवीन नियमापूर्वी ईपीएफवर मिळणारे संपूर्ण व्याज करमुक्त होते. त्यामुळे कर्मचाऱ्यांची मोठी बचत झाली. परंतु २०२१ नंतर, २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त योगदानावरील व्याज करपात्र होईल. हा बदल विशेषत: उच्च उत्पन्न श्रेणीतील कर्मचाऱ्यांवर परिणाम करतो, जे ईपीएफमध्ये मोठी रक्कम जमा करतात.

### • या बदलाचा उद्देश काय आहे?

ईपीएफमध्ये मोठी रक्कम जमा करून कर लाभ मिळवणाऱ्या उच्च उत्पन्न गटातील लोकांना लक्ष्य करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. कर प्रणाली अधिक संतुलित करण्यासाठी आणि समानता आणण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले.

### • काय लक्षात ठेवावे?

जर तुम्हाला अतिरिक्त कर टाळायचा असेल, तर ईपीएफमध्ये गुंतवणूक करताना, तुमचे योगदान २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल याची खात्री करावी लागेल. तसेच, टीडीएस टाळण्यासाठी तुमचे पॅन कार्ड लिंक करणे खूप महत्त्वाचे आहे.

# नव्या वर्षात शेअर बाजार कसा असेल?

२० डिसेंबर रोजी संपलेल्या सप्ताहामध्ये मागील दोन वर्षातील सर्वांत मोठी साप्ताहिक घसरण झाल्यानंतर डिसेंबर महिन्यातील शेवटचा सप्ताह भारतीय बाजारात तेजी दिसून आल्याने कॅलेंडरीय वर्षाखेर दिलासादायक झाली. विदेशी गुंतवणूकदारांचा विक्रीचा मारा आणि संमिश्र जागतिक पातळीवरुन येणारे संमिश्र संकेत यांकडे दुर्लक्ष करत डीआयआयकडून झालेल्या जोरदार खरेदीमुळे बाजारात तेजीला उधाण आले.



विशेषतः सप्ताहाच्या शेवटच्या सत्रात आणि जानेवारी सिरीजच्या पहिल्या दिवशी निफ्टीने २३,९३८ पर्यंत झेप घेतली, तर सेन्सेक्स ७९,०४३ पर्यंत झेपावला. साप्ताहिक आधारावर पाहिल्यास गेल्या आठवड्यामध्ये सेन्सेक्समध्ये ६५७.४८ अंकांची म्हणजेच ०.८४ टक्क्यांची वाढ झाली आणि ७८६९९.०७ वर हा निर्देशांक बंद झाला. निफ्टीमध्येही ०.९५ टक्क्यांची म्हणजेच २२५.९ अंकांची वाढ झाली आणि हा निर्देशांक २३८१३.४० या पातळीवर बंद झाला. लार्जकॅप इंडेक्समध्येही ०.७ टक्क्यांची वाढ पाहायला मिळाली. निफ्टी ऑटो आणि फार्मा इंडेक्समध्ये या तुलनेत अधिक वाढ दिसून आली. हे दोन्ही निर्देशांक गतसप्ताहात २ टक्क्यांची वधारले. गतसप्ताहात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारात ६३२२.८८ कोटी रुपयांच्या समभागांची विक्री केली; तर डीआयआयकडून १०,९२७.७३ कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी करण्यात आली.

शेअर बाजार वधारत असताना रुपयाची घसरण मात्र कायम आहे. गतसप्ताहाखेरीस शुक्रवारी रुपयातील घसरण तीव्र झाली आणि रुपयाने ८५.८१ ही नीचांकी पातळी गाठली. देशाचा परकीय चलनाचा साठा सलग तिसऱ्या आठवड्यात घसरून ६४४ अब्ज झाला असून हा मे नंतरचा नीचांक आहे.

सोमवारपासून खऱ्या अर्थाने नव्या सिरीजची सुरुवात होईल. आता गुंतवणूकदारांसाठी औत्सुक्याचा विषय आहे तो म्हणजे २०२५ हे कॅलेंडर वर्ष बाजारासाठी कसे असेल? त्यादृष्टीने दोन वेगवेगळे मतप्रवाह बाजार विश्लेषकांमध्ये आहेत. काही जणांच्या मते, सलग काही वर्षे चांगला परतावा दिल्यानंतर २०२५ हे वर्ष कदाचित नकारात्मक परताव्याचे असू शकते. या तर्काला दुसरा आधार जागतिक पटलावर येऊ घातलेल्या संभाव्य आर्थिक मंदीच्या शक्यता आणि २० जानेवारी रोजी अमेरिकेच्या अध्यक्षपदावर विराजमान झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून घेतली जाऊ शकणारी संभाव्य आर्थिक-राजकीय धोरणे. या दोन्हींचा परिणाम भांडवली बाजारांवर नकारात्मक होण्याची शक्यता वर्तवली जाते. त्याचे संकेतही काही समभागांच्या चार्टस्वरही दिसू लागला आहे. त्यामुळे गुंतवणूकदारही काहीसे धास्तावले आहेत. २०२० मध्ये भारतीय कंपन्यांचा नफा सुमारे ४ लाख कोटी रुपये इतका होता. २०२४ मध्ये तो वाढून १५ लाख कोटींवर पोहोचला आहे. याचाच अर्थ चार वर्षांत तो वाढून चौपट झाला आहे. २०२५ मध्ये मागील पाच वर्षांपेक्षा नफ्याचा आकडा कमी राहण्याची शक्यता आहे.

परंतु दुसऱ्या बाजूला २०२५ मध्ये बाजार नवी उसळी घेत नवे शिखर गाठेल असे अनेक अर्थतज्ज्ञांचे आणि बाजार विश्लेषकांचे म्हणणे आहे. सध्या विदेशी गुंतवणूकदारांचा विक्रीचा मारा जोरदार दिसत असला तरी २०२५ मध्ये हा कल बदलू शकतो. तसेही भारतीय शेअर बाजारात एफआयआयचा हिस्सा १६ टक्के आहे, तर डीआयआयचा हिस्सा ३८ टक्के आहे. २०२५ मध्ये तरलता वाढून डीआयआयकडून बाजारात येणारा पैसा आणखी वाढेल आणि नव्या वर्षात निफ्टी २७५०० पर्यंत झेपावू शकतो असे या गटाचे म्हणणे आहे. यामध्ये फार्मा, कन्झ्युमर गुडस् आणि कॅपिटल गुडस् यांसारख्या क्षेत्रांमध्ये येणाऱ्या काही महिन्यात चांगली तेजी दिसू शकते.चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीमध्ये कंपन्यांची कामगिरी आणि जीडीपी काहीसा कमी दिसत असला तरी तिसरी तिमाही दमदार राहील असे सांगितले जात आहे. अमेरिकेमध्ये फेडरल रिझर्व्हने व्याजदरात कपात केल्यास आयटी कंपन्यांच्या समभागात मोठी तेजी दिसू शकते. त्यामुळे आयटी आणि फार्मा हे २०२५ चे नेतृत्व करतील अशी शक्यता आहे. याखेरीज यंदाच्या अर्थसंकल्पानंतर बाजाराला मोठा बूस्टर मिळण्याची शक्यता आहे. या दोन्ही मतप्रवाहांचा लसावि काढल्यास भारतीय बाजार नवीन वर्षांत नकारात्मक परतावा देण्याची शक्यता कमी आहे.

■ शेअर बाजार

या पार्श्वभूमीवर चालू आठवड्याचा विचार केल्यास निफ्टीसाठी २४२०० ची पातळी महत्त्वाची आहे. या पातळीच्या पुढे स्थिरावल्यास निफ्टी पुन्हा आधी २५ हजार आणि नंतर २६ हजारांकडे झेपावण्यास तयार होऊ शकतो. मागील १०-१५ वर्षांचा चार्ट पाहिल्यास जानेवारी महिना हा कमी परतावा देणारा राहिला आहे. त्यामुळे या संपूर्ण महिन्याभरात अल्पकालीन आणि मध्यमकालीन गुंतवणूकदारांनी फार मोठी जोखीम घेणे टाळणे ईष्ट ठरेल. चालू आठवड्याचा विचार करता गिफ्ट निफ्टीमध्ये दिसणारी हलकीशी घसरण बाजाराची सुरुवात होण्याची शक्यता आहे. अमेरिकन बाजारात शुक्रवारी घसरण झाली आहे. कच्च्या तेलाचे भाव वधारले आहेत. भारतीय बाजारात शुक्रवारी मोठी तेजी दिसून आली खरी; पण वरच्या पातळीवर बाजार टिकू शकला नाही. निफ्टीसाठी २४०५८ च्या वर बाजार स्थिर झाल्यास एक उसळी २४२०० पर्यंत दिसू शकते. पण सध्याची एकंदर स्थिती सेल ऑन राईज ही रणनीती योग्य ठरेल असे दर्शवणारी आहे.

एकंदरीत बाजाराचा कल पाहून खरेदीचा निर्णय घेणे आवश्यक आहे. घसरणीचा कल दिसल्यास काही काळ संयम बाळगणे योग्य ठरेल. नवीन वर्षामध्ये सेबीने बदललेल्या नियमांचाही परिणाम दिसणार आहे. अशा वेळी कमी जोखीम पत्करत आपले कॅलेंडर वर्ष चांगला नव्हे तर दमदार परतावा देणारे कसे ठरेल यादृष्टीने रणनीती आखावी.

◆◆◆

# पोस्टातील बचत खात्याविषयी...



आजच्या युगात बचत खाते ठेवणे ही अपरिहार्य गरज बनली आहे. सरकारी योजनांचा लाभ घेणे असो, युपीआयद्वारे पेमेंट करणे असो किंवा एफडीमध्ये गुंतवणूक करणे असो, हे सर्व बचत खात्याशिवाय अपूर्ण आहे. यासाठी बहुतेकदा लोक बँकांमध्ये बचत खाती उघडतात. याबाबत टपाल खात्याचा विचार फारसा कुणी करत नाही. परंतु पोस्ट ऑफिसमध्ये खाते उघडून आपल्याला अनेक फायदे मिळू शकतात. विशेष म्हणजे पोस्ट ऑफिस बचत खाते केवळ बँकेसारख्या सुविधा देत नाही तर तेथे व्याजदर देखील अधिक आकर्षक आहेत. तसेच हे खाते तुमच्या बचतीच्या सुरक्षिततेची खात्री देते. पोस्टातील सेव्हिंग अकौंटमध्ये पैसे जमा करणे, पैसे काढणे आणि पासबुकची सुविधाही उपलब्ध आहे. हे खाते तुमची बचत तर वाढवतेच पण भविष्यातील गरजांसाठी एक सुरक्षित पर्याय बनते. त्यामुळे तुम्हाला तुमची बचत सुरक्षित आणि फायदेशीर मार्गाने वाढवायची असेल, तर पोस्ट ऑफिस बचत खात्याचा नक्कीच विचार करा.

विशेष म्हणजे बँकांमधील नियमित बचत खात्यासाठी, सामान्यत: १,००० रुपये किमान शिल्लक राखणे आवश्यक आहे. परंतु पोस्ट ऑफिस बचत खाते फक्त ५०० रुपयांमध्ये उघडले जाते आणि हीच त्याची किमान शिल्लक मर्यादा देखील आहे.

यातील रकमेवर खातेदाराला चार टक्के दराने वार्षिक व्याज मिळते. याशिवाय, चेकबुक, एटीएम कार्ड, ई-बँकिंग/मोबाइल बँकिंग आणि आधार लिंकिंग याही सुविधा पोस्टातील बचत खात्यावर मिळतात.

एवढेच नाही तर या खात्याद्वारे तुम्ही अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना यांसारख्या प्रमुख सरकारी योजनांचा लाभही घेऊ शकता.

आयकर कायद्याच्या कलम ८० टीटीए अंतर्गत, १०,००० रुपयांपर्यंतच्या बचत खात्यावर मिळणाऱ्या व्याजावरील कर सवलतीचा लाभ देखील येथे उपलब्ध आहे. बँकांची बचत खाती २.७०% ते ३.५% पर्यंत व्याजदर देतात, पोस्ट ऑफिस बचत खात्यावर तुम्हाला जास्त व्याज मिळते.

**पोस्ट ऑफिस बचत खाते:** ४.०%
**एसबीआय आणि पीएनबी बचत खाते:** २.७०%
बँक ऑफ इंडिया बचत खाते: २.९०%
एचडीएफसी आणि आयसीआयसीआय **बचत खाते:** ३.००% ते ३.५०%

खाते कोण उघडू शकते?
पोस्ट ऑफिस बचत खाते एकल प्रौढ, दोन प्रौढ (संयुक्त खाते), अल्पवयीन (१० वर्षांपेक्षा जास्त), मानसिकदृष्ट्या अस्वस्थ व्यक्तींसाठी पालक आणि अल्पवयीन लोक त्यांच्या स्वत: च्या नावाने देखील उघडू शकतात. तथापि, एका व्यक्तीच्या नावाने एकच खाते उघडले जाऊ शकते. संयुक्त खातेदारांपैकी एकाचा मृत्यू झाल्यास, दुसरा खातेदार आपोआप एकमेव खातेदार बनतो. परंतु त्याचे आधीच एकच खाते असल्यास संयुक्त खाते बंद करणे बंधनकारक असेल.


### ठेव आणि पैसे काढण्याचे नियम

पोस्टातील बचत खात्यात किमान ५०० रुपये जमा करणे अनिवार्य आहे. यानंतर १० रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम जमा केली जाऊ शकते. पैसे काढण्याची किमान मर्यादा ५० रुपये ठेवण्यात आली आहे. तथापि, खात्यातील शिल्लक ५०० रुपयांपेक्षा कमी असल्यास प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी ५० रुपये शुल्क कापले जाईल आणि शिल्लक शून्यावर पोहोचल्यास खाते बंद केले जाईल. पोस्ट बचत खात्यात महिन्याच्या १० तारखेपासून महिन्याच्या शेवटपर्यंतच्या किमान शिल्लक रकमेवर व्याज मोजले जाते.

या कालावधीत शिल्लक ₹५०० च्या खाली आल्यास, व्याज मिळणार नाही. आर्थिक वर्षाच्या शेवटी खात्यात व्याज जोडले जाते आणि खाते बंद केल्यावर व्याज मागील महिन्यात जमा केले जाईल.

तीन वर्षांपर्यंत खात्यात कोणताही व्यवहार न झाल्यास खाते निष्क्रिय होईल. ते पुन्हा सुरू करण्यासाठी, तुम्हाला नवीन केवायसी आणि पासबुक संबंधित कागदपत्रे पोस्ट ऑफिसमध्ये सबमिट करावी लागतील. ◆◆◆

# नव्या वर्षात सोनेबाजार, इक्विटी बाजार कसा राहील?



● वेध नववर्षाचा



**एकीकडे सोन्याच्या भावाने उच्चांकी पातळी गाठलेली असताना दुसरीकडे शेअर बाजाराची भरारी पाहून गुंतवणूकदार गोंधळून गेले आहेत. शेअर बाजारात जावे की सोन्याकडे. अर्थात परतावा पाहिला तर दोन्ही क्षेत्राकडून गुंतवणुकदारांना चांगला परतावा मिळाला आहे. अशावेळी नवीन वर्ष काही दिवसांवर येऊन ठेपलेले असताना गुंतवणुकदार नवीन वर्षात गुंतवणुकीची नवी रणनिती आखत आहेत. अशावेळी कोणत्या क्षेत्राला झुकते माप द्यावे याचा विचार करणे स्वाभाविक आहे.**

**सोन्यातील गुंतवणूक :** नवीन वर्षांत सोन्यात नव्याने गुंतवणूक करणाऱ्यांनी नव्या कॅलेंडर वर्षांत सोन्याची वाटचाल कशी राहिल, याचा विचार करायला हवा. सध्याची स्थिती पाहिली तर शेअर बाजाराच्या तुलनेत सोन्यातील परतावा हा अधिक सुरक्षित आणि स्थिर म्हणता येईल. सोन्याने १९९० ते ऑक्टोबर २०२४ पर्यंत १०.६ टक्के कम्पाउंडिंग परतावा दिला असला तरी तो शेअर बाजाराच्या दीर्घकाळातील गुंतवणुकीच्या तुलनेत कमीच म्हणावा लागेल. अर्थात चालू कॅलेंडर वर्षात सोन्याची किमत अधिक राहू शकते आणि त्याचा फायदा कमी कालावधीतील गुंतवणूकदारांना मिळाला आहे.

चालू कॅलेंडर वर्षातं सोन्याच्या भावात जसजशी वाढ झाली तसतसा सहा महिने आणि वर्षभरासाठी गुंतवणूक करणाऱ्यांनी त्याचा फायदा उचलला. सोन्याचे भाव कमी होताच, त्याची खरेदी केली जाते आणि वाढ होताच नफावसुली केली जाते. हा ट्रेंड अर्थातच चांगला नाही. ज्यांना परतावा आणि चढउतार यात संतुलन हवे आहे, अशा गुंतवणुकदारांसाठी सोन्यातील गुंतवणूक सुरक्षित राहू शकते. नफेखारी करणाऱ्यांनाही गुंतवणुकीचा हा चांगला पर्याय राहू शकतो. जगातील प्रमुख रेटिंग आणि रिसर्च एजन्सी गोल्डमन सॅक्सच्या मते, २०२५ मध्ये सोन्याची किंमत विक्रमी पातळीवर पोचू शकते. गोल्डमनचा अहवाल पाहिला तर कमी कालावधीसाठी गुंतवणुकदारांचा कल हा सोन्याकडे झुकू शकतो आणि परिणामी किंमतीत आणखी वाढ होऊ शकते. कोटक सिक्युरिटीजच्या एका अहवालानुसार, नव्या वर्षात देखील सोन्याला मागणी राहील, असे चित्र आहे. गोल्ड इटिएफचा विचार केला तर मावळत्या वर्षात गोल्ड ईटीएफमधील गुंतवणुक ही तीन पटीने वाढलेली दिसते. गेल्या वर्षीच्या ३३३.३७ कोटी रुपयांच्या तुलनेत वाढून ती १२५६ कोटी रुपयांवर पोचली आहे. आपण २०२४ मधील परतावा आणि सध्याच्या स्थितीचा विचार केला तर नव्या वर्षात तीस टक्के किंमत अपेक्षित आहे. म्हणजे जानेवारीत सोने खरेदी केले तर वर्षाच्या अखेरीस त्याची किंमत ३० टक्क्यांनी वाढलेली असेल.

**इक्विटी बाजाराची स्थिती :** यावर्षी शेअर बाजारात चांगली तेजी पाहवयास मिळाली. निर्देशांकाने नवीन विक्रम नोंदवला तर कधी कोलांडउडी देखील मारली. यावर्षी प्रारभी बीएसई निर्देशांक सुमारे बारा हजारांनी वाढलेला दिसतो आणि त्याचबरोबर गुंतवणुकदारांना सुमारे १६ टक्क्यांनी परतावा देखील दिला. गेल्यावर्षी गुंतवणुकदारांना सुमारे १८ टक्के परतावा मिळाला होता. २०२४ मध्ये सोन्याने विक्रमी पातळी गाठली असली तरी शेअर बाजाराने देखील गुंतवणूकदारांना निराश केलेले नाही. यावर्षी गुंतवणुकदारांनी जबरदस्त कमाई करत सुमारे ११०.५७ लाख कोटी रुपयांचा एकूण परतावा मिळवला आहे. अर्थात दीर्घकाळात शेअर बाजारातील परतावा कमी होतो. शेअर बाजारात मिड कॅप आणि स्मॉलकॅप देखील मागे राहिलेले नाही. या काळात दोन्ही क्षेत्रातील गुंतवणुकदारांना सुमारे ३४ ते ३५ टक्के परतावा मिळाला आहे. तज्ज्ञांच्या मते, शेअर बाजाराचा ट्रेंड हा नव्या वर्षांतही कायम राहू शकतो. बाजाराचा अभ्यास करणाऱ्या 'जेफरीज'च्या एका अहवालानुसार भारतीय अर्थव्यवस्था चांगल्या रितीने वाटचाल करेल आणि त्यामुळे गुंतवणुकीचा ओघ वाढेल. साहजिकच त्याचा परिणाम भारतीय शेअर बाजारावर दिसेल आणि परिणामी शेअर बाजार २०२५ मध्ये चांगली कामगिरी करू शकतो. सांगायचे तात्पर्य की एकाच क्षेत्रात सर्व गुंतवणूक करण्यापेक्षा दोन्ही क्षेत्रात थोडीथोडी गुंतवणूक करत पोर्टफोलिओत वैविध्यपणा आणावा. तसेच गुंतवणूक सोन्याची किंवा शेअर बाजारातील असो, गुंतवणूकदारांनी आर्थिक सल्लागारांशी चर्चा करूनच त्याचा निर्णय घेतला पाहिजे.

◆◆◆

# स्पेशलायझ्ड इन्वेस्टमेंट फंड म्हणजे काय?

सेबीने काही महिन्यांपूर्वी एका नवीन असेट क्लासचा मंजुरी दिली. त्यास स्पेशलाइज्ड इन्वेस्टमेंट फंड (एसआयएफ) असे म्हणतात. हा फंड सामान्य म्युच्युअल फंडपेक्षा ॲडव्हान्स इन्वेस्टमेंट स्ट्रॅटजीचा वापर करतो. बाजार नियामक संस्थेने अधिक जोखीम उचलणाऱ्या गुंतवणुकदारांसाठी 'एसआयएफ'ला परवानगी दिली आहे. 'एसआयएफ'चे फायदे कोणते आहेत, सेबीने का परवानगी दिली, सध्याच्या म्युच्युअल फंडप्रमाणे सध्याची ही योजना वेगळी कशी आहे. यासंदर्भात जाणून घेऊ.




● म्युच्युअल फंड

**एसआयएफ म्हणजे काय :** स्पेशलायज्ड इन्वेस्टमेंट फंड (एसआयएफ) चा ॲसेट क्लास पाहिला तो म्युच्युअल फंडच्या सध्याच्या योजना आणि पोर्टफोलिओ मॅनेजमेंट सर्व्हिसेस (पीएमएस) यांच्यात दुवा साधणारा आहे. एसआयएफची गुंतवणूक आणि स्वरुप वेगळे आहे. सध्या म्युच्युअल फंडच्या योजनांत शंभर रुपयांनी देखील गुंतवणूक करता येते. त्याचवेळी पीएमसेसमध्ये किमान ५० लाख रुपयांची गुंतवणूक करावी लागते. अल्टरनेटिव्ह इन्वेस्टमेंट फंड (एआयएफ) मध्ये किमान गुंतवणूक एक कोटी रुपये आहे.

**या फंड्चा उद्देश :**
'एएसआयएफ'च्या ओपन एंडेड-क्लोज्ड अॅडेड किंवा इंटरवल स्ट्रक्चरमध्ये फंड मॅनेजरला ॲडव्हान्स इन्वेस्टमेंट स्ट्रॅटजी आखण्याची परवानगी दिली आहे. 'एसआयएफ'मधील गुंतवणूक किमान दहा लाख रुपयांपासून सुरू करावी लागते. 'सेबी'ने अगोदरच सांगितल्याप्रमाणे म्युच्युअल फंडच्या योजना आणि पीएमएस यांच्यात कोणताही पडदा नसल्याने काही वेळा गुंतवणुकदार जादा परतावा मिळवण्यासाठी अनाधिकृत आणि नोंदणी नसलेल्या गुंतवणूक योजनांत गुंतवणूक करतात. अशावेळी पैसे बुडण्याची भीती राहते. तसेच अशा योजनांचे म्होरके पैसे घेऊन पळून गेल्याच्या बातम्या येतात.

**एक्रिडिटेड गुंतवणूकदारांना परवानगी नाही**
'एसएआयएफ'मध्ये ॲक्रिडिटेड गुंतवणूकदारांना गुंतवणुकीची परवानगी नाही. ॲक्रिडिटेड गुंतवणूकदार म्हणजे, वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणुक योजनांचे जाणकार. अशावेळी ते अनेक निर्णय विचारपूर्वक घेत असतात. जगभरात अशा प्रकारचे गुंतवणूकदार बाजार नियामक संस्थांकडे नोंदलेले असतात.

**गुंतवणूकदारांची रणनिती :** 'एसआयएफ'च्या फंड मॅनेजर्सना १५ टक्क्यांपर्यंत पैसे एखाद्या एकल सिक्योरिटीत गुंतवणूक करण्याची परवानगी आहे. हा फंड सध्याच्या योजनांत सिंगल सिक्योरिटीत कमाल दहा टक्के गुंतवणूक करण्याची परवानगी देतो. फिक्स्ड रिटर्न योजनांत कोणत्याही एका इश्यूअरच्या सिक्योरिटीत कमाल वीस टक्के गुंतवणूक करण्याची परवानगी आहे. सेबीच्या परवानगीने यात वाढ करत २५ टक्क्यांपर्यंत गुंतवणूक नेता येऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, एसआयएफ पोर्टफोलिओ हा फंड मॅनेजरला 'टेलर्ड' अणि 'इनोव्हेटिव्ह प्रॉडक्ट्स'च्या निर्मितीची परवानगी देतो.

◆◆◆

# नव्या वर्षात नवे बदल




● माहीत हवे

२०२४ वर्ष संपायला अवघे काही दिवस उरले असून देशभरात नवीन वर्षाच्या सुरुवातीची तयारी सुरू झाली आहे. १ जानेवारी २०२५ पासून देशात अनेक मोठे बदल लागू होणार आहेत, ज्याचा प्रभाव प्रत्येक कुटुंबावर आणि प्रत्येकाच्या खिशावर पडणार आहे. या बदलांमध्ये स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या एलपीजी सिलिंडरच्या किंमतीपासून ते युपीआय पेमेंटपर्यंतच्या नियमांचा समावेश आहे.

**गॅस सिलिंडरच्या दरात बदल :** १ जानेवारी २०२५ रोजी, तेल विपणन कंपन्या स्वयंपाकघर आणि व्यावसायिक एलपीजी गॅसच्या किमती सुधारू शकतात. तेल कंपन्या गेल्या काही काळापासून व्यावसायिक सिलिंडरच्या दरात वाढ करत आहेत, मात्र १४ किलोच्या घरगुती सिलिंडरचे दर स्थिर आहेत.

याशिवाय हवाई इंधनाच्या किमतीतही बदल होण्याची शक्यता आहे.

**कार खरेदी करणे महाग होईल :** नवीन वर्षात कार खरेदी करणे महाग होणार आहे. देशातील अनेक ऑटोमोबाईल कंपन्यांनी वाहनांच्या किमती वाढवण्याची घोषणा केली आहे. त्यात एक ते तीन टक्के वाढ होईल. कंपन्यांनी यासाठी उत्पादन शुल्क आणि खर्चात वाढ झाल्याचे कारण सांगितले आहे.

**ईपीएफओ खातेधारकांसाठी भेट :** पुढील वर्षी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना म्हणजेच ईपीएफओकडून पेन्शनधारकांसाठी एक नवीन नियम लागू केला जाईल, जो त्यांच्यासाठी एक मोठी भेट आहे. या अंतर्गत पेन्शनधारकांना आता देशातील कोणत्याही बँकेतून त्यांच्या पेन्शनची रक्कम काढता येणार असून त्यासाठी अतिरिक्त पडताळणीची गरज भासणार नाही. एटीएमसारख्या पैसे काढण्याची सुविधा मार्च-एप्रिलपर्यंतही उपलब्ध होऊ शकते.

**युपीआय पेमेंट मर्यादा वाढेल :** फीचर फोनवरून ऑनलाइन पेमेंट सुलभ करण्यासाठी युपीआयने युपीआय १२३ पे लाँच केले आहे. त्याची व्यवहार मर्यादा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, ती १ जानेवारीपासून लागू होणार आहे. यानंतर वापरकर्ते १०,००० रुपयांपर्यंतचे ऑनलाइन पेमेंट करू शकाल. यापूर्वी ही मर्यादा फक्त ५,००० रुपये होती.

**शेअर बाजार :** सेन्सेक्स आणि बँकेक्सच्या एक्स्पायरी दिवसांमध्ये बदल झाला असून ती आता दर आठवड्यातील शुक्रवारी नव्हे तर मंगळवारी होणार आहे. त्रैमासिक आणि सहामाही करार शेवटच्या मंगळवारी संपतील. दुसरीकडे, एनएसई निर्देशांकाने निफ्टी ५० च्या मासिक सौद्यांसाठी गुरुवार निश्चित केला आहे. ◆◆◆

## शेतकऱ्यांची ४ तारखेला महापंचायत

# आज पंजाब बंदची हाक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** शेतकरी आंदोलनाचा भाग म्हणून ३० डिसेंबरला पंजाब बंदची हाक देण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी ४ जानेवारी ला खनौरी सीमेवर मेगा किसान महापंचायत आयोजित करण्याची घोषणा केली आहे. देशभरातील लाखो शेतकऱ्यांपर्यंत तो पोहोचू शकतो. शेतकऱ्यांनी याची तयारी सुरू केली असून जगजितसिंग डल्लेवाल या महापंचायतीत शेतकऱ्यांना मोठा संदेशही देऊ शकतात.

सामाजिक कार्यकर्त्या सोनम वांगचुक यांनी शनिवारी खनौरी सीमेवर शेतकरी नेते डल्लेवाल यांची भेट घेतली. पत्रकार परिषदेत शेतकरी नेते अभिमन्यू कोहार आणि काकासिंग कोटडा यांनी ४ जानेवारी रोजी खनौरी सीमेवर किसान महापंचायत आयोजित करण्याची घोषणा केली. दल्लेवाल यांना देशातील विविध राज्यातील शेतकऱ्यांना भेटायचे असल्याने त्यांच्या इच्छेनुसार महापंचायतीचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

डल्लेवाल यांना देशभरात शेतकरी चळवळ उभी करायची आहे. पंजाब, हरयाणा, यूपी, मध्य प्रदेश, राजस्थान आणि इतर अनेक राज्यांतील शेतकरी या महापंचायतीत सहभागी होणार आहेत. प्रकृती अस्वास्थ्यानंतरही दल्लेवाल महापंचायतीला संबोधित करणार आहेत.

उपोषणाला बसलेले शेतकरी नेते जगजितसिंह डल्लेवाल यांनी आज सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीवर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, एकीकडे सर्वोच्च न्यायालय त्यांच्या आरोग्याबद्दल चिंता व्यक्त करत आहे आणि दुसरीकडे आंदोलक शेतकऱ्यांवरील कठोरता वाढवण्याचे आदेश सरकारला देत आहे. अशी सहानुभूती त्यांनी आयुष्यात पहिल्यांदाच पाहिली आहे.

आज सर्वोच्च न्यायालयात सर्वोच्च न्यायालयाला लिहिलेल्या पत्राचा विचार केल्यानंतर न्यायालय सरकारला शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याचे निर्देश देईल, अशी आशा दल्लेवाल यांनी व्हिडिओत व्यक्त केली आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने पंजाब सरकारला अधिक कठोरता वाढवण्याचे आदेश दिले आहेत. हे शब्द केंद्र सरकारकडून आले आहेत, असे वाटते, असे ते म्हणाले.

## इन्फोग्राफिक्स

## बँक कर्मचाऱ्यानेच केला घोटाळा

### कंपनीची १२ कोटींची आर्थिक फसवणूक




**नवी दिल्ली :** एखाद्यासोबत सायबर फ्रॉड झाल्यास तो बँकेची मदत घेतो, मात्र बँक कर्मचाऱ्याने एका कंपनीची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आर्थिक फसवणूक आणि सायबर फसवणुकीच्या आरोपाखाली कर्नाटक पोलिसांनी ॲक्सिस बँकेच्या रिलेशनशिप मॅनेजरसह तिघांना अटक केली आहे. बेंगळुरूयेथील ड्रीमप्लग पेटेक सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून रिलेशनशिप मॅनेजरने १२ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. रिलेशनशिप मॅनेजर वैभव पिठाडिया (२९), बँकिंग एजंट नेहा बेन विपलभाई, इन्शुरन्स एजंट आणि वैभवचा भागीदार शैलेश अशी आरोपींची नावे आहेत. याशिवाय यात कमिशन एजंट शुभमचाही समावेश आहे. ड्रीमप्लगचे कार्यकारी नरसिंह वसंता शास्त्री यांच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली. कंपनीच्या खात्यातून काही संशयास्पद व्यवहार होत असल्याचे लक्षात आल्यानंतर ड्रीमप्लगच्या अधिकाऱ्यांनी १२ नोव्हेंबर रोजी पोलिसांत तक्रार दाखल केली. ॲक्सिस बँकेच्या दोन खात्यांमधून १२.२ कोटी रुपये काढण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. हा व्यवहार २९ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर दरम्यान झाला. आरोपींनी ड्रीमप्लगच्या खात्यात काही बदल करून त्याचा ॲक्सेस घेतला होता. आरोपींनी बनावट स्वाक्षरी करून, ईमेल आयडी आणि नोंदणीकृत मोबाइल क्रमांक त बदल करण्याची मागणी करून कंपनीच्या संचालक मंडळाचा प्रस्तावही तयार केला होता. त्यानंतर ॲक्सिस बँकेनेही त्याला मंजुरी दिली.

## » Selected

## गोळीबारामुळे अन्सारीला अटक



**लखनौ** : उत्तर प्रदेश मधल्या बुलंदशहर येथील खुर्जा येथे रिझवान अन्सारी आणि त्यांचा मुलगा अडनान अन्सरी याला अटक करण्यात आली आहे. रिझवान अन्सरी यांना जामीन मिळाल्यानंतर उन्मदाच्या भरात त्याने हवेत गोळीबार केला. त्याच्या या कृत्यामुळे उत्तर प्रदेश पोलिसांनी त्याला पुन्हा एकदा तुरूंगात खडी फोडायला पाठवले आहे. रिझवान अन्सारी हा कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईला हत्यार पुरवण्याचे काम करीत असे. त्याची तुरूंगातून सुटका झाल्यानंतर फटाके फोडत त्याचे जंगी स्वागत करण्यात आले. यासाठी डीजेची सुद्धा व्यवस्था करण्यात आली. शांतता भंग केल्या प्रकरणी खुर्जा पोलिसांनी रिझवान अन्सारी आणि त्याच्या मुलाला अटक करण्यात आली आहे. यामध्ये पोलिसांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.


## आपच्या योजनेची चौकशी

**नवी दिल्ली** : आम आदमी पक्षाच्या प्रस्तावित कल्याणकारी योजना 'महिला सन्मान योजना' साठी नोंदणीच्या नावाखाली "गैर-सरकारी" लोक दिल्लीतील रहिवाशांची वैयक्तिक माहिती गोळा करत असल्याच्या आरोपाची चौकशी दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी सुरू केली आहे. राज्यपाल कार्यालयातर्फे पाठवण्यात आलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, नायब राज्यपाल यांनी मुख्य सचिवांना अशी इच्छा व्यक्त केली आहे की गैर-सरकारी लोकांकडून वैयक्तिक माहिती आणि फॉर्म गोळा करण्याच्या प्रकरणात विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करावी. शिवाय, लाभ देण्याच्या नावाखाली भोळ्या नागरिकांच्या वैयक्तिक माहिती गोळा करून त्यांच्या गोपनीयतेचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्याचे निर्देश पोलिस आयुक्त क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देऊ शकतात. सरकारी योजनांमध्ये फसव्या नावनोंदणीसाठी शिबिरे आयोजित करणाऱ्या खाजगी व्यक्तींवर कारवाई करण्याचा सल्ला पोलिस आयुक्तांना दिला जाऊ शकतो.

## नवी मुंबई, ठाणे आणि सोलापूर पोलिसांची कारवाई

# १६ बांगलादेशी घुसखोरांना राज्यात अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** बेकायदेशीरपणे भारतात घुसून वैध कागदपत्रांशिवाय वास्तव्य करणाऱ्या सहा महिलांसह सोळा बांगलादेशी नागरिकांना महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) अटक केली आहे. एटीएसने सुरू केलेल्या विशेष मोहिमेदरम्यान ही अटक करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. नवी मुंबई, ठाणे आणि सोलापुरात गेल्या २४ तासांत पोलिसांच्या मदतीने कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी सात पुरुष आणि सहा महिलांना अटक केली आहे. त्यांच्याविरोधात फॉरेनर्स ॲक्ट आणि इतर संबंधित कायद्यांतर्गत तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या बांगलादेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांचा वापर करून आधार कार्डसारखी भारतीय कागदपत्रे कशीबशी मिळवली होती. एटीएस आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने शुक्रवारी रात्री जालना जिल्ह्यातून तीन बांगलादेशी नागरिकांना अटक केली. आरोपी भोकरदन तालुक्यात क्रशर मशिनवर काम करत होते. एटीएस आणि स्थानिक पोलिसांच्या संयुक्त कारवाईत त्यांना अन्वा आणि कुंबरी गावातून अटक करण्यात आली. या तिघांकडे बनावट ओळखपत्रे होती, जेणेकरून ते भारतात बेकायदेशीरपणे काम करू शकतील, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे. गेल्या दोन वर्षांपासून ते बेकायदा राहत होते, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली. भारतीय दंड संहिता आणि परदेशी नागरिक कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अलीकडेच पार्क स्ट्रीटजवळील मार्किस स्ट्रीट परिसरातून आणखी एका बांगलादेशी नागरिकाला अटक करण्यात आली होती, जो वर्षानुवर्षे शहरात राहत होता आणि त्याच्याकडे बनावट कागदपत्रेही होती. बनावट कागदपत्रे देणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यासाठी तपास सुरू असून अटक करण्यात आलेल्या व्यक्तींचीही चौकशी केली जात आहे. यापूर्वी आसाम पोलिसांनी बंदी घातलेल्या इस्लामी संघटनेच्या आठ दहशतवाद्यांना अटक केली होती.

## राष्ट्रवादी लढवणार दिल्ली विधानसभा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पुन्हा एकदा राष्ट्रीय दर्जा मिळवण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार जोरदार प्रयत्न करणार आहेत. सध्या दिल्लीमध्ये विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस दिल्ली निवडणूक लढवणार हे अगोदरच ठरले आहे. आता पक्षाने ११ उमेदवारांची घोषणा केली आहे.

यापूर्वी झालेल्या जम्मू-काश्मीरच्या निवडणुकीमध्ये देखील अजित पवार यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. दिल्लीतील बुरारी विधानसभा मतदारसंघातून रतन त्यागी, बदलीमधून मुलायम सिंह, मंगलोपुरीतून खेम चंद तर चांदनी चौक मतदारसंघातून खालीद रहमान यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बल्ली मारनमध्ये मोहम्मद हारून, छतरपूरमध्ये नरेंद्र तन्वर, संगम विहारमध्ये कमर अहमद, ओखलामध्ये इम्रान सैफी यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# देशभरात थंडीची लाट कायम, पावसाची शक्यता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशभरात थंडीची लाट कायम असून, डोंगराळ भागात पाऊस आणि बर्फवृष्टीमुळे थंडीच्या लाटेची तीव्रता वाढली आहे. शनिवारी उत्तर प्रदेश, हरयाणा, दिल्ली आणि बिहारच्या अनेक भागात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. दरम्यान, बिहार, झारखंडसह अनेक राज्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. डोंगराळ भागात बर्फवृष्टीमुळे मैदानी भागातही हाहाकार माजणार आहे. राजधानी दिल्ली, पंजाब, उत्तराखंड आणि राजस्थानमध्ये हलका पाऊस सुरू आहे.

शनिवारी राजधानी दिल्ली आणि आसपासच्या परिसरात पावसाने हजेरी लावली. याशिवाय अनेक ठिकाणी गारपीटही झाली. हवामान खात्याने उत्तर प्रदेशातील १५ जिल्ह्यांमध्ये पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर उत्तरकाशीच्या यमुनोत्रीमध्ये सुमारे दीड फूट जाडीच्या बर्फाची चादर टाकण्यात आली आहे. हवामान खात्याने येथे पाऊस आणि बर्फवृष्टीचा इशारा दिला आहे.

राजधानी दिल्लीत हलका पाऊस पडू शकतो. त्यामुळे तापमानात घट होणार आहे. नोएडामध्येही हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने येथे ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. याशिवाय दिल्लीत पुढील दोन दिवस दाट धुक्याचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. राजधानी दिल्लीत डिसेंबरमध्ये झालेल्या पावसाने १०१ वर्षांचा विक्रम मोडला आहे. गुरुग्राम आणि फरिदाबादमध्ये फॉग अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### मध्य प्रदेशात गारपिटीचा इशारा

● मध्य प्रदेशातही गारपीट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. स्कायमेटच्या अंदाजानुसार, पुढील २४ तासांत पश्चिम हिमालयात जोरदार बर्फवृष्टी होऊ शकते. पूर्व उत्तर प्रदेश आणि पूर्व मध्य प्रदेशातही हलका पाऊस पडू शकतो. पुढील दोन ते तीन दिवस राज्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून, हवामानात धुके, धुके आणि दव पडण्याची शक्यता आहे. पुढील २४ तासांत राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत पाऊस किंवा ढगाळ हवामान राहील.

## छत्रपती शिवरायांचा पुतळा लष्कराने उभारला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय लष्कराने १४,३०० फूट उंचीवर पँगॉंग सरोवराच्या काठावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला आहे. पूर्व लडाख भागात हे ठिकाण चीनसोबतच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ (एलएसी) आहे. लष्कराच्या लेहस्थित १४ व्या कोअरने सांगितले की, या पुतळ्याचे उद्घाटन भारतीय राज्यकर्त्याच्या अविचल भावनेचे स्मरण करण्यासाठी करण्यात आले होते, ज्यांचा वारसा आजही प्रेरणास्त्रोत आहे.

या पुतळ्याचे अनावरण नुकतेच १४ व्या कोअरचे जनरल ऑफिसर कमांडिंग लेफ्टनंट जनरल हितेश भल्ला यांच्या हस्ते करण्यात आले. "फायर अँड फ्युरी कॉर्प्स" या नावाने ते प्रसिद्ध आहे. हा कार्यक्रम भारतीय राज्यकर्त्याच्या अतूट भावनेचा उत्सव आहे, ज्याचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. समकालीन लष्करी क्षेत्रात आपले 'प्राचीन सामरिक कौशल्य' समाविष्ट करण्यासाठी भारतीय लष्कराने प्रयत्न केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण अशा वेळी करण्यात आले आहे, जेव्हा भारत आणि चीनने डेमचोक आणि डेपसांग या दोन ठिकाणांहून सैन्य मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. यासह जवळपास चार वर्षांपासून सुरू असलेला सीमेवरील तणाव संपुष्टात आला.

## चक्रीवादळाचा झंझावात

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**टेक्सास :** टेक्सास आणि मिसिसिपी येथे आलेल्या चक्रीवादळाने घरांचे मोठे नुकसान झाले आणि वाहनांनाही त्याचा फटका बसला.

## अफगाणिस्तानमधील हल्ल्याचा घेतला बदला

# तालिबान्यांनी केला पाकवर हल्ला



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानकडून अफगाणिस्तानच्या पक्तिका प्रांतातील बरमल जिल्ह्यात हवाई हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात ४६ जणांचा मृत्यू झाला होता. आता अफगाणिस्तानकडून या हवाई हल्ल्याचा बदला घेत पाकच्या सैनिकांवर हल्ला केला आहे.

अफगाणिस्तानच्या सीमेवर झालेल्या चकमकीत पाकिस्तानच्या निमलष्करी दलाचे १९ जवान ठार झाले, तर काहीजण जखमी झाले आहेत. पाकिस्तानच्या प्रत्युत्तरात काही अफगान सैनिकांचाही मृत्यू झाला आहे. पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांत आणि अफगाणिस्तानच्या खोस्त प्रांताच्या सीमेवर दोन्ही देशांच्या सैन्याकडून रात्रभर गोळीबार सुरू होता.

तालिबानच्या अधिकाऱ्यांनी अफगाणिस्तानमधील दक्षिणपूर्वेतील पक्तिका प्रांतात पाकिस्तानकडून हवाई हल्ला करण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. या हल्ल्यात ४६ जण मारले गेल्याचा आरोप तालिबानच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. यामध्ये महिला आणि लहान मुलांची संख्या सर्वाधिक होती. त्यानंतर आता अफगाणिस्तानकडून पाकिस्तानवर हल्ला करण्यात आला आहे. हवाई हल्ल्याबाबत बोलताना पाकच्या अधिकाऱ्यांनी दहशतवाद्यांच्या ठिकाणांना लक्ष करण्यात आले होते, असा दावा केला होता. सीमेवरील चकमकीबाबत तालिबानच्या संरक्षण मंत्रालयाने माहिती दिली की, त्यांच्या सैन्याने पाकिस्तानमधील काही ठिकाणांवर हल्ला केला आहे.

# हप्ते भरुनही विम्यापासून वंचित; शहापूरातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खराब

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कसारा :** प्रतीवर्षी पीकविमा हप्ता भरूनही शेतकरी मात्र पीक विम्यापासून वंचित राहतो आहे. पीकविम्याचे पैसे घेऊन पीक विमा कंपन्या मात्र मालामाल होत आहेत. तर दुसरीकडे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खराब होत चालली आहे. त्यामुळे पीक विमा भरूनही शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे येईनात, अशी म्हणण्याची वेळ आली आहे. लवकरात लवकर पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावेत, अशी मागणी शहापूर तालुक्यातील शेतकरी करीत आहेत

अवकाळी पावसाने किंवा हवामानातील बदलामुळे शेतकऱ्यांच्या आबां पिकासह अन्य पिकाचे मोठे नुकसान झाले. त्यांचे पंचनामे होऊन चार महिने उलटून गेले, तरी अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर एच.डी एफ.सी.ॲग्रो इन्शुरन्स या पीकविमा कंपन्यांकडून पैसे जमा होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी दिसत आहे. शेतकरी पीक विमा भरत असतानाही शहापूर तालुक्याला सातत्याने डावलण्यात आले आहे. वास्तविक, नैसर्गिक आपत्तीच्या वेळेला शेतकऱ्यांसाठी संरक्षण कवच म्हणून विमा कंपन्यांचा उल्लेख होतो. मात्र, त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही.




### घोषणा हवेतच विरल्या

● शेतकऱ्यांना पीक विमा मिळेल, अशा घोषणा केल्या होत्या. मात्र, त्या घोषणा हवेतच विरल्या गेल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. दरम्यान विमा कंपनी बोलते शासनाकडून आम्हाला अद्याप पैसे मिळाले नाहीत तर शासन म्हणते पैसे पाठवले तर मग शेतकऱ्यांचा खात्यात विलंब का? असा प्रश्न उपस्थित केला असून विमाधारक शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित विमा रक्कम जमा करावी, यासाठी शहापूर तालुक्यातील आंबा उत्पादक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कृषीधिकारी, तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

# बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**ठाणे :** एकीकडे रस्ते अपघातांत वाढ होत चालली असून वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस आणि शासनाकडून वारंवार आवाहन केले जाते. परंतु त्यानंतरही बेशिस्त वाहन चालक मंडळी काही केल्या ऐकायचे नाव घेत नसल्याने अखेर वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर डोंबिवली शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे.

वाहतुकीचे नियम वाहन चालकांसह नागरिकांच्या सुरक्षेकरिता बनविले आहेत. मात्र अनेक चालक नियमांचे पालन करत नसल्याने ते स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालत असतात. अशा चालकांना वठणीवर आणण्यासाठी कारवायांचा बडगा उगारण्यात येतो. सुशिक्षितांच्या सांस्कृतिक नगरीत नियम आणि कायद्यांची पायमल्ली करणाऱ्यांच्या विरोधात शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने शनिवारी रात्रीपासून कारवाईची झोड घेतली. शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतूक पोलिसांकडून वाहन चालकांवर होत असलेली कारवाई पाहून अनेक रिक्षावाल्यांनी घाबरून पळ काढला. मात्र आपल्यावरही कारवाई होऊ शकते, याची जाणीव झालेले दुचाकी व चारचाकीचे चालक वाहतूक नियमांचे पालन करताना आढळून आले.

वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी २५ डिसेंबरपासून मंगळवारच्या थर्टी फर्स्टनंतर अगदी पहाटेपर्यंत ब्रेथ ॲनालायझरचा वापर सुरू केला आहे.

## २०२४ : भारतीय रेल्वेची सुसाट कामगिरी

# वर्षभरात ६,४५० किमी ट्रॅकचे नूतनीकरण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** २०२५ वर्षारंभाला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. आता २०२४ वर्षाला निरोप देताना वर्षभरातील आपल्या कामाचा लेखाजेखा भारतीय रेल्वेने रविवारी प्रसिद्ध केला आहे. या वर्षी भारतीय रेल्वेने ६,४५० किलोमीटर ट्रॅकचे नूतनीकरण, ८,५५० किलोमीटर ट्रॅकचे टर्नआउट नूतनीकरण. तसेच रेल्वेच्या प्रमुख विभागांमध्ये १३० किमी प्रतितास वेग वाढवला असल्याचे रेल्वे मंत्रालयाने आपल्या अहवालात नमूद केले आहे. भारतीय रेल्वेने या वर्षी देशभरातील ३,२१० किलोमीटर ट्रॅकचे विद्युतीकरण केले.



### वर्षभरात १,४७३ टन मालवाहतूक

● ईस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर आणि वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर द्वारे ७२,००० पेक्षा जास्त ट्रेन धावण्याची सुविधा देऊन कमाई वाढवण्यासाठी सरत्या वर्षात रेल्वेने १,४७३ दशलक्ष टन मालवाहतूक देखील केली.

विद्युतीकृत ब्रॉडगेज नेटवर्क ९७ टक्क्यांपर्यंत वाढवले आणि अक्षय ऊर्जा क्षमता २,०१४ मेगावॅटपर्यंत पोहोचली आहे.

वर्षभरात विक्रमी १३६ वंदे भारत गाड्या आणि पहिली नमो भारत रॅपिड रेल्वे सुरू करण्यात आली, तसेच हंगामामध्ये २१,५१३ विशेष ट्रेनही सादर करण्यात आल्या, असे पुनरावलोकन अहवालात नमूद करण्यात आले आहे. सुमारे १० हजार लोको कवच सुरक्षा तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, रेल्वे नेटवर्कवरील सुरक्षितता सुधारण्यासाठी आधुनिकीकरण मोहिमेचा एक भाग म्हणून १५,००० किमी मार्गासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत, असेही या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

भारतीय रेल्वेने देशातील ८० स्थानांसह ७८ हेरिटेज साइट्सचे डिजीटलीकरण केले, तर घूमसारख्या सणांनी पर्यटनाला चालना दिली आहे. एकूण २०८ कोटी रुपये खर्चून हत्तींचा अपघात रोखण्यासाठी ईशान्य फ्रंटियर रेल्वेमधील गंभीर संवेदनशील ठिकाणी नो एलिफंट इंट्रूजन डिटेक्शन सिस्टम देखील कार्यान्वित करण्यात आल्याचेही या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.



"मी त्याला सांगितले असते की मेलबर्नमधील दुसरी इनिंग ही कसोटी कारकीर्द लांबवण्याची तुझ्याकडे अंतिम संधी असेल. तो अयशस्वी ठरल्यास पुढील महिन्यातील सिडनी क्रिकेट मैदानावर होणाऱ्या अंतिम कसोटी सामन्याच्या इलेव्हनमधून रोहितला वगळणून बुमराहची कर्णधार म्हणून निवड केली असती." — मार्क वॉ

" परिस्थिती कशीही असली तरीही लढण्याचा हेतू निश्चितच होता. त्यानंतर ज्या गोष्टी घडल्या त्या खरोखरच आनंददायी होत्या. अनेक लोकं आमचे समर्थम करत होते अशा वातावरणात खेळायला खरच मज्जा आली. ही आमच्यासाठी खुप मोठे गिफ्ट होते. " — वॉशिंग्टन सुंदर



# भारत आज इतिहास रचणार?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मेलबर्न :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील चौथा कसोटी सामना मेलबर्नमध्ये खेळला जात आहे. या बॉक्सिंग डे कसोटीच्या चौथ्या दिवसाचा खेळ संपला आहे. ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात ९ गडी गमावून २२८ धावा केल्या आहेत. पहिल्या डावाच्या आधारे त्यांच्याकडे १०५ धावांची आघाडी होती. अशा स्थितीत संघाची एकूण आघाडी ३३३ धावांची झाली आहे. मेलबर्नमध्ये आतापर्यंत ३०० हून अधिक धावांच्या लक्ष्याचा यशस्वी फक्त एकदाच यशस्वी झाला आहे.

या कसोटीच्या पाचव्या दिवशी भारताला मेलबर्नमध्ये इतिहास रचण्याची संधी आहे. त्याकरिता या मैदानावर सर्वात मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करायचा आहे. याआधी १९२८ मध्ये इंग्लंडने कांगारुंच्या विरुद्ध मेलबर्न कसोटीत ३३२ धावांचा सर्वात यशस्वी पाठलाग केला होता. या सामन्यात ३०० हून अधिक धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पार केले गेले. सोमवारी ९८ षटकांचा सामना होणार आहे. सुरुवातीच्या सत्रात टीम इंडिया ऑस्ट्रेलियन इनिंगला रोखू शकते की नाही हे पाहणे बाकी आहे.

चौथ्या दिवशी स्कॉट बोलँड आणि नॅथन लायन यांच्या शानदार फलंदाजीमुळे भारताची विकेट्ससाठी तळमळ उडाली. आतापर्यंत दोघांनी ११० चेंडूत १०व्या विकेटसाठी ५५ धावांची भागीदारी केली आहे. लियॉन ४१ धावांवर नाबाद असून बोलंड १० धावांवर नाबाद आहे. ऑस्ट्रेलियाला १७३ धावांवर नववा धक्का बसला. कांगारूंनी पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताचा पहिला डाव रविवारीच ३६९ धावांवर संपला. लियॉन आणि बोलँडच्या भागीदारीमुळे भारताचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. ११० चेंडू म्हणजेच दोघांनी मिळून सुमारे १८ षटके खेळली आहेत. दिवसाच्या शेवटच्या षटकात टीम इंडियालाही संधी मिळाली, पण बुमराहचा तो चेंडू नो बॉल होता. बुमराहचा नो बॉल लियॉनच्या बॅटच्या काठाला लागला आणि चेंडू स्लिपमध्ये गेला. राहुलनेही झेल घेतला, पण नो बॉलमुळे लियॉनला जीवदान मिळाले. दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाची फलंदाजी खराब होती. मार्नस लॅबुशेनने सर्वाधिक ७० धावा केल्या. त्याचवेळी कर्णधार पॅट कमिन्सने ४१ धावांची खेळी केली. याशिवाय लियॉनने धावा केल्या आहेत. ऑस्ट्रेलियाच्या पाच फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. यामध्ये सॅम कॉन्स्टास (८), ट्रॅव्हिस हेड (१), मिचेल मार्श (०), ॲलेक्स कॅरी (२) आणि मिचेल स्टार्क (५) यांचा समावेश आहे.

## मेलबर्नमध्ये ३००+ धावांचे लक्ष्य फक्त एकदाच चेस



### बुमराह २० च्या सरासरीने २०० बळी घेणारा पहिला गोलंदाज

● खेळ थांबला तेव्हा कांगारूंची आघाडी ३३३ धावांची होती. रविवारी झालेल्या विक्रमांच्या यादीत जसप्रीत बुमराहचे नाव आघाडीवर आहे. २० पेक्षा कमी सरासरीने २०० कसोटी बळी घेणारा बुमराह जगातील पहिला गोलंदाज आहे. तो १४२ विकेट्ससह SENA देशांमध्ये (दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया) आघाडीचा गोलंदाज बनला आहे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ मध्ये बुमराहने आतापर्यंत २९ विकेट घेतल्या आहेत.

# न्यूझीलंडने पहिला टी-२० सामना ८ धावांनी जिंकला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मांगानुई पर्वत :** न्यूझीलंडने पहिल्या टी-२० मध्ये श्रीलंकेचा ८ धावांनी पराभव केला. माउंट मंगानुई येथे श्रीलंकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. न्यूझीलंडने ८ गडी गमावून १७२ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेला ८ गडी गमावून १६४ धावाच करता आल्या. श्रीलंकेकडून पथुम निसांकाने ९० धावा केल्या, पण तो आपल्या संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. ३ बळी घेणारा जेकब डफी सामनावीर ठरला. न्यूझीलंडकडून डॅरिल मिशेलने ६२ आणि मायकेल ब्रेसवेलने ५९ धावा केल्या.



शनिवारी नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या घरच्या संघाची सुरुवात खराब झाली. ६५ धावांपर्यंत मजल मारण्यापूर्वी संघाने ५ विकेट गमावल्या. टीम रॉबिन्सन ११, रचिन रवींद्र ८, मार्क चॅपमन १५, ग्लेन फिलिप्स ८ आणि मिचेल हे खाते न उघडता बाद झाले. ५ विकेट लवकर बाद झाल्यानंतर डॅरिल मिशेल आणि मायकेल ब्रेसवेल यांनी संघाची धुरा सांभाळली. दोघांनी १०५ धावांची भागीदारी केली आणि धावसंख्या १७० धावांपर्यंत नेली. मिशेल ६२ धावा करून आणि ब्रेसवेल ५९ धावा करून बाद झाला.

शेवटी कर्णधार मिचेल सँटनर आणि झॅचरी फोक्स प्रत्येकी १ धावच करू शकले. न्यूझीलंडने १७२ धावा केल्या. श्रीलंकेकडून बिनुरा फर्नांडो, महिश तिक्षाना आणि वानिंदू हसरंगा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. मथिश पाथीरानाला एक विकेट मिळाली.

# ऑस्ट्रेलियन मीडियाच्या टार्गेटवर भारतीय खेळाडू

**मेलबर्न :** ऑस्ट्रेलियन मीडियाकडून भारतीय खेळाडूंवर खालच्या स्तरावर टीका केली जात आहे. आधी विराट कोहली व आता कर्णधार रोहित शर्मावर भारतीय ऑस्ट्रेलियन मीडियाकडून टीकास्त्र सोडण्यात आले आहे. युवा फलंदाज सॅम कॉन्स्टास सोबतच्या भांडणानंतर विराट कोहलीला ऑस्ट्रेलियन न्यूजपेपरमध्ये जोकर म्हणण्यात आले होते आणि आता ऑस्ट्रेलियन मीडियाकडून रोहितवर टीका करण्यात आली आहे.

बॉर्डर गावस्कर मालिकेला सुरूवात होण्यापूर्वी ऑस्ट्रेलियन मीडियाकडून कोहलीचे 'राजा' म्हणत जोरदार स्वागत करण्यात आले. पण मेलबर्न मधील कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी विराट कोहली व पदार्पणवीर सॅम कॉन्स्टास यांच्यात बाचाबाची झाली. त्यानंतर आयसीसी कडून कोहलीवर दंड देखील आकारण्यात आला. पण ऑस्ट्रेलियन मीडियाने वृत्तपत्रात विराटचा जोकर म्हणून उल्लेख केला.

# मेलबर्नमध्ये धावांचा यशस्वी पाठलाग करायचा विक्रम काय आहे?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मेलबर्न :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील चौथा कसोटी सामना मेलबर्नमध्ये खेळवला जात आहे. टीम इंडियाची शानदार गोलंदाजी चौथ्या दिवशी पाहायला मिळाली, पण तरीही ऑस्ट्रेलियाने मोठी आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियाने चौथ्या दिवशी ९ बाद २२८ धावा केल्या आहेत, यासह त्यांनी ३३३ धावांची आघाडी मिळवली आहे. आता मेलबर्नच्या मैदानावर किती धावांचं लक्ष्य गाठणं शक्य आहे, रेकॉर्ड काय सांगतो ते जाणून घेऊया.

ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. त्यानंतर टीम इंडियाचा पहिला डाव ३६९ धावांवर आटोपला आणि ऑस्ट्रेलियाकडे १०५ धावांची आघाडी शिल्लक राहिली होती. भारताने चौथ्या दिवशी चांगली गोलंदाजी केली पण



ऑस्ट्रेलियाच्या अखेरच्या जोडीने ५० धावांची भागीदारी रचत भारताला धक्का दिला आहे. आता टीम इंडियाचे टेन्शन थोडं वाढताना दिसत आहे. मेलबर्नमध्ये कसोटी क्रिकेटचं सर्वात मोठं यशस्वीपणे इंग्लंडच्या संघाने गाठलं होतं.

मेलबर्नच्या मैदानावर ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात १९२८ साली कसोटी सामना खेळवला गेला. या सामन्याच्या शेवटच्या डावात इंग्लंडसमोर ३२२ धावांचे लक्ष्य होते. जे इंग्लंडने गाठले होते आणि ऑस्ट्रेलियाला पराभूत केले होते. कसोटी क्रिकेटमधील या मैदानावर हे आतापर्यंतचे सर्वात मोठे लक्ष्य होते. मेलबर्नमधील ३४ यशस्वी पाठलाग करत विजय मिळवणारे संघ इंग्लंड (८) आणि ऑस्ट्रेलिया (२१) आहेत. फेब्रुवारी १९५३ मध्ये दक्षिण आफ्रिकेने २९५ धावांचे आव्हान सहा गडी राखून जिंकले होते.

# महाराष्ट्राचा विजयी चौकार; सिद्धेश वीरचे दीड शतक





**नवी दिल्ली :** सिद्धेश वीरचे दीड शतक आणि अंकित बावणेची शतकी खेळी यामुळे साडेतीनशे धावांचा डोंगर उभा करणाऱ्या महाराष्ट्राने विजय हजारे करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत हिमाचल प्रदेश संघावर ८४ धावांनी विजय मिळवला आणि ब गटातील आपले अव्वल स्थान अधिक बळकट केले. महाराष्ट्राचा चार सामन्यांतला हा चौथा विजय आहे. सलग दुसऱ्या सामन्यात त्यांनी मोठ्या विजयास गवसणी घातली. प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ३६० धावा केल्यानंतर हिमाचल प्रदेशला २७६ धावांत गुंडाळले. महाराष्ट्राची सुरुवात फारच निराशाजनक होती. कर्णधार ऋतुराज गायकवाड केवळ आठ धावांवर बाद झाला तर ओम भोसले एकच धाव करू शकला. त्यामुळे महाराष्ट्राची २ बाद १७ अशी अवस्था झाली. मात्र तेथून सिद्धेश वीर आणि अंकित बावणे यांनी तिसऱ्या विकेटसाठी २५३ धावांची भागीदारी केली आणि संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला.

# दिव्यांग खेळाडूंचे राज्यस्तरीय ॲथलेटिक क्रीडा स्पर्धेत यश

**वेंगुर्ले :** पॅरालिम्पिक स्पोर्ट असोसिएशन महाराष्ट्राच्या वतीने शिवाजी विद्यापीठ सिंथेटिक ट्रॅक येथे पॅरालिंपिक चॅम्पियनशिप २०२४ या राज्यस्तरीय दिव्यांग खेळाडूंच्या ॲथलेटिक क्रीडा स्पर्धा पार पडल्या.



यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दिव्यांग खेळाडूंनी दिव्यांगत्वावर मात करून उज्ज्वल यश संपादन केले. सिंधुदुर्गने चार पदक जिंकताना २ सुवर्ण, १ रजत व १ कास्य पदक प्राप्त केले आहे. या यशाबद्दल यशस्वी खेळाडूंचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणाऱ्या साहस प्रतिष्ठान, सिंधुदुर्ग या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा व DCCBI च्या पश्चिम भारत प्रमुख रुपाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सिंधुदुर्ग जिल्ह्याचा संघ कोल्हापूर येथे ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी रवाना झाला होता. संपूर्ण महाराष्ट्रातून या स्पर्धेसाठी ४०० हून अधिक दिव्यांग खेळाडू सहभागी झाले होते. सिंधुदुर्ग जिल्हा संघात स्मिता गावडे, दीक्षा तेली, श्रुती पाटील, जोस्पिन डिसोजा, प्राजक्ता गावकर व मुरलीधर घाडी हे खेळाडू सहभागी झाले होते. सिंधुदुर्ग जिल्हा संघाचे नेतृत्व करताना देवगड तालुक्यातील दीक्षा तेली हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून गोळाफेक मध्ये सुवर्णपदक व थाळी फेक मध्ये सुवर्णपदक अशी दोन पदके पटकावून आगामी होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे.

# नितीशच्या वडिलांनी गावस्करांच्या पायावर ठेवलं डोकं



**मेलबर्न :** मेलबर्न कसोटीत कारकिर्दीतील पहिले शतक झळकावणारा नितीश रेड्डीचे वडील मुत्याला रेड्डी यांनी माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांची भेट घेतली. यावेळी मुत्याला यांनी गावस्कर यांच्या पायावर डोके ठेवून अभिवादन केले. गावस्कर यांनी मुत्याला यांना मिठी मारली. या भावनिक क्षणी गावसकरही रडले. ते म्हणाले, "तुमच्या बलिदानामुळे भारताला नितीश रेड्डी नावाचा हिरा मिळाला आहे. तुम्ही किती बलिदान दिले आहे हे आम्हाला माहीत आहे. तुम्ही खूप संघर्ष केला आहे. तुमच्यामुळेच भारताला हिरा मिळाला आहे. 'भारतीय क्रिकेटला एक हिरा सापडला आहे." नितीश रेड्डी यांनी बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात कसोटी पदार्पण केले. मेलबर्नमध्ये झालेल्या चौथ्या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी शनिवारी त्याने कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले. नितीशच्या शतकानंतर सुनील गावस्कर यांनी त्याला स्टँडिंग ओव्हेशन दिले.

# आयसीसीच्या मानाच्या पुरस्कारासाठी भारताच्या श्रेयांका पाटीलला नामांकन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेटपटू श्रेयंका पाटील हीची आयसीसी वूमेन्स इमर्जिंग क्रिकेटर ऑफ द इअर पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. श्रेयंकानी या वर्षी (२०२४) आपल्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला आहे. कर्नाटकच्या २२ वर्षीय फिरकीपटूसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये या वर्षी उल्लेखनीय कामगिरी केली आहे, ज्यामुळे ती प्रतिष्ठित विजेतेपदाची प्रबळ दावेदार बनली आहे. श्रेयंका पाटील (भारत), सास्किया हॉर्ले (स्कॉटलँड), ॲनेरी डेर्कसेन (दक्षिण आफ्रिका)



आणि फ्रेया सार्जेंट (आयर्लंड) या खेळाडूंना आयसीसी महिला इमर्जिंग क्रिकेटर ऑफ द इयर २०२४ पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे.

श्रेयंका डिसेंबर २०२३ मध्ये महिला कॅरिबियन प्रीमियर लीगमध्ये सहभागी झाली. या स्पर्धेत सहभागी होणारी ती पहिली भारतीय खेळाडू ठरली. काही काळानंतर, तिने भारतीय महिला क्रिकेट संघासाठी पदार्पण केले आणि तेव्हापासून ती सातत्यपूर्ण कामगिरी करत आहे.

२०२४ मध्ये, श्रेयंकाने १३ ट्वेंटी-२० सामने खेळले.

ज्यामध्ये तिने १५ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर तिला अवघे दोन वन-डे सामने खेळण्याची संधी मिळाली, ज्यामध्ये तिने चार विकेट्स घेतल्या. एक गोलंदाज म्हणून तिची अष्टपैलू कामगिरी भारतासाठी महत्त्वाची ठरली. कारण तिने पॉवरप्लेमध्ये, मधल्या षटकांमध्ये किंवा अंतिम षटकांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. या वर्षी, तिने ऑस्ट्रेलिया, बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध महत्त्वपूर्ण सामने खेळले. त्याचबरोबर महिला ट्वेटी-२० आशिया कप आणि ट्वेटी-२० वर्ल्डकप यांसारख्या प्रमुख स्पर्धांमध्येही भाग घेतला.

# आंध्र क्रिकेट असोसिएशन नितीशला २५ लाख रु. देणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मेलबर्न कसोटीत शतक झळकावून भारताचे पुनरागमन करणाऱ्या नितीश रेड्डी यांना आंध्र क्रिकेट असोसिएशन २५ लाख रुपयांचे रोख बक्षीस देणार आहे. शनिवारी नितीशने कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले.

CAC चे अध्यक्ष केसिनेनी शिवनाथ म्हणाले, आंध्र क्रिकेट असोसिएशनसाठी हा आनंदाचा क्षण आहे. आंध्रचा नितीश भारतासाठी कसोटी आणि टी-२० मध्ये चांगली कामगिरी करत आहे. सन्मान म्हणून नितीश यांना २५ लाख रुपयांचे बक्षीस दिले जात आहे.

२१ वर्षीय रेड्डीच्या शतकाच्या



बळावर भारताने तिसऱ्या दिवशी ९ विकेट गमावून ३५८ धावा केल्या. संपूर्ण मालिकेत चमकदार कामगिरी करणाऱ्या रेड्डीने चौथ्या कसोटीतही शानदार खेळी केली. त्याच्या खेळीचे वर्णन माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी भारताच्या कसोटी इतिहासातील सर्वात महान कसोटी डावांपैकी एक म्हणून केले आहे.

# अफगाणिस्तानच्या रहमत शाहचे ऐतिहासिक द्विशतक!

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तान आणि झिम्बाब्वे यांच्यात सुरू असलेल्या कसोटी सामन्यात एक वेगळाच थरार पाहायला मिळत आहे. हा सामना आता अनिर्णितकडे वाटचाल करताना दिसत असला तरी चार दिवसांच्या खेळाबद्दल बोलायचे झाले तर दोन्ही संघांच्या फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे या सामन्यात अफगाणिस्तानच्या रहमत शाहने ऐतिहासिक द्विशतक झळकावले आहे. विशेषतः रहमत शाहची फलंदाजी अफगाणिस्तानसाठी उत्कृष्ट ठरली. अफगाणिस्तानकडून रहमत शाहने २३४ धावांची खेळी साकारली. या डावात रहमतने ४२४ चेंडूंचा सामना केला, ज्यामध्ये त्याने २३ चौकार आणि ३ षटकारही मारले. यासह रहमत अफगाणिस्तानसाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात मोठी खेळी खेळणारा फलंदाज ठरला आहे. रहमत शाहने २०० धावांचा टप्पा गाठताच, कसोटी क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारा तो दुसरा अफगाणिस्तानचा फलंदाज ठरला.

# कोनेरू हंपी बनली वर्ल्ड चॅम्पियन; गुकेशनंतर भारताचे चेसमधील आणखी मोठे यश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतासाठी २०२४ वर्ष बुद्धिबळ खेळात विशेष ठरलं आहे. भारतीय बुद्धिबळपटूंनी या वर्षात मोठं यश यंदा मिळवलं आहे. भारतीय बुद्धिबळ संघांनी काही महिन्यांपूर्वी ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदकाला गवसणी घातली होती. त्यानंतर डी गुकेशने वर्ल्ड चॅम्पियनशीप जिंकली होती. आता भारतीय यशात आणखी भर पडली आहे. ३७ वर्षीय ग्रँडमास्टर कोनेरू हंपीने इतिहास रचला आहे. तिने रविवारी वर्ल्ड रॅपिड चेस चॅम्पियनशीप जिंकली आहे.

तिने महिला गटात ११ व्या फेरीत इंडोनेशियाच्या इरिन खारिस्मा सुकंदर हिला पराभूत



करत हे विजेतेपद जिंकले. कोनेरुचे हे दुसरे वर्ल्ड रॅपिड चेस चॅम्पियनशीप विजेतेपद आहे. यापूर्वी तिने २०१९ मध्येही हे विजेतेपद पहिल्यांदा जिंकले होते. त्यामुळे दोन किंवा त्यापेक्षा अधिकवेळा हे विजेतेपद जिंकणारी ती चीनच्या जू वेन्जुननंतरची दुसरीच खेळाडू आहे.

तिची रॅपिड चॅम्पियनशीपमध्ये नेहमीच सातत्यपूर्ण कामगिरी राहिली आहे. तिने २०१२ मध्ये मॉक्सोत कांस्यपदक जिंकले होते, तसेच गेल्यावर्षी तिने रौप्य पदक जिंकेल होते.

रविवारी तिने ११ फेरीनंतर ८.५ पॉइंट्ससह अव्वल क्रमांक मिळवला आणि विजेतेपदावर नाव कोरले. ११ व्या फेरीपूर्वी कोनेरुसह जू वेन्जुन, काटेरिना लाग्नो, हरिका द्रोणावल्ली, अफ्रुझा खामदामोवा, टॅन झ्होन्गयी आणि इरिन यांचे ७.५ पॉइंट्स होते. पण ११ व्या फेरीनंतर बाकी खेळाडू ८ पॉइंट पर्यंतच पोहचू शकले, तर कोनेरुने विजयासह ८.५ पॉइंट्स मिळवले.

## भारत-ऑस्ट्रेलियासाठी कसे आहे समीकरण?

# आफ्रिकेने डब्लूटीसी फायनलचे मिळवलं तिकीट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिका विरुद्ध पाकिस्तान संघात सेंच्युरियनमध्ये रोमांचक बॉक्सिंग डे कसोटी सामना झाला. दक्षिण आफ्रिकेने चौथ्या दिवशी अवघ्या २ विकेट्सने विजय मिळवला. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने २ सामन्यांच्या कसोटी मालिकेच १-० अशी आघाडी घेतली आणि त्याचसोबत आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप स्पर्धेच्या फायनलमध्ये प्रवेश निश्चित केला आहे.

हा सामना वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या दृष्टीनेही



महत्त्वाचा आहे. या सामन्यावर भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांचेही लक्ष होते. दोन्ही संघांची वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप फायनलमध्ये जाण्याचा मार्ग सोपा होण्यासाठी पाकिस्तानने विजय मिळवावा अशी इच्छा होती. कारण सध्या दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि भारत या तीन संघांमध्ये फायनलमध्ये जाण्यासाठी सर्वाधिक चूरस होती. मात्र आता दक्षिण आफ्रिकेने विजय निश्चित केल्याने आता फायनलमध्ये ऑस्ट्रेलिया किंवा भारत या दोन्ही पैकी एकच संघ जागा मिळवू शकतो.

त्यामुळे आता सध्या मेलबर्नमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात सुरू असलेला सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या सामन्यात विजय मिळणारा संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप फायनलच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकणार आहे. भारताने जर मेलबर्न आणि सिडनी दोन्ही कसोटी सामन्यात विजय मिळवला, तर भारत थेट फायनलमध्ये प्रवेश करेल. तसेच जर ऑस्ट्रेलियाने मेलबर्न आणि सिडनी दोन्ही कसोटी सामने जिंकले, तर थेट फायनल गाठतील. जर भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धची कसोटी मालिका २-१ अशा फरकाने जिंकली, तर भारताला आशा करावी लागेल की श्रीलंकेने किमान ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक सामना अनिर्णित तरी राखावा. तसेच असे झाले तर ऑस्ट्रेलियाला फायनलमध्ये जाण्यासाठी श्रीलंकेविरुद्ध दोन्ही कसोटी सामने जिंकावेच लागतील. जर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिका २-२ अशी बरोबरी झाली, तर भारताची आशा असेल की श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाला दोन्ही सामन्यात पराभूत करावे, तर ऑस्ट्रेलियाला श्रीलंकेविरुद्ध किमान एक सामना तरी जिंकावा लागेल.